१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार | दि. २६ ऑक्टोबर २०२६ | अंक १४० | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

एफडीएकडून ४ कोटींचा अन्नसाठा जप्त

कळंबोली : दिवाळी आणि आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत अन्न व औषध प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. पनवेलमधील कामोठे परिसरात केलेल्या धडक कारवाईत तब्बल ४ कोटी २१ लाख ६ हजार ९६१ रुपये किमतीचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. संबंधित अन्नपदार्थांवर मिसब्रँडेड लेबलचा दोष आढळून आला असून, काही अन्नपदार्थ निकृष्ट दर्जाचे असण्याचा संशय



•➤पान २ वर

'क्लिप खोटी ठरवण्यासाठी पडद्यामागून प्रयत्न'

अंकुशनगर : मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित व्हायरल ऑडिओ क्लिप प्रकरणावरून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. ही क्लिप खोटी ठरवण्यासाठी पडद्यामागून प्रयत्न सुरू असल्याची कुजबूज आपल्या कानावर आली आहे. मात्र, कितीही प्रयत्न झाले तरी या प्रकरणातील सत्य समाजासमोर आणणारच, असा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाच्या तपासात सत्याच्या बाजूने उभे राहावे, असे आवाहनही जरांगे यांनी केले आहे. रविवारी अंकुशनगर येथील निवासस्थानी जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेतली यावेळी ते बोलत होते.

टोरंटविरोधात शेकाप मैदानात

प्रस्तावित प्रकल्पासाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड

आदिवासींच्या हक्कांवर घाला घालून कसला विकास?

मोदींच्या संभाव्य दौऱ्यात काळे झेंडे दाखवण्याचा शेकापचा इशारा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।


आदिवासींनी एखादे झाड तोडले तर त्यांच्यावर कायद्याचा बडगा उगारायचा; मग टोरंट पॉवरच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड चालणार असेल, तर वनविभागाचा कायदा कुठे जातो? असा घणाघाती सवाल शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला आहे. रविवारी (दि.२५) आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सायडोंगर येथील प्रस्तावित ३,००० मेगावॅट क्षमतेच्या टोरंट पॉवर प्रकल्पावरून शेकापने आक्रमक भूमिका घेतली असून, जंगल, पाणी आणि आदिवासींच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय शेकाप गप्प बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य दौऱ्यावेळी काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवण्याची भूमिकाही पक्षाने घेतली आहे.



पंतप्रधानांच्या स्वागतासाठी निसर्गाचा बळी?

स्थानिकांचा तीव्र विरोध असतानाही सायडोंगर-कर्जत ३,००० मेगावॅट पंप स्टोरेज जलविद्युत टोरंट प्रकल्पासाठी पाली येथील तब्बल ३२ हजार ४९० वृक्षतोडीला वनविभागाने मंजुरी दिली आहे. कर्जत पूर्व वनपरिक्षेत्र अधिकारी समीर दि. शिंदे यांनी दि.१४ ऑक्टोबर रोजी जारी केलेले पत्र कृषीवलच्या हाती लागले आहे. या पत्रानुसार प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन वळविण्यास अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर बाधित झाडे तोडण्याचे निर्देश पत्राद्वारे देण्यात आले आहेत. विकासाच्या नावाखाली हजारो वृक्षांवर कुऱ्हाड चालवण्याच्या या निर्णयामुळे पर्यावरणाचा विनाश अटळ असून, स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता दडपशाही सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.



सभेला चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती

कर्जतमधील वृक्षतोडीसंदर्भात पर्यावरण बचाव समितीने बुधवारी (दि.२८) सभेचे आयोजन केले आहे. या आयोजित सभेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील तसेच राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. रोहित पवार उपस्थित राहणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.



स्थानिकांच्या हक्कांशी तडजोड नाही

प्रकल्पाच्या जलाशयाच्या प्रारंभिक भरण्यासाठी २३ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित झाला आहे. कंपनीकडून स्थानिक पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार नसल्याचा दावा केला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, पाणीवापराचे नियोजन, उपलब्ध जलसाठा आणि स्थानिकांच्या गरजांसाठीची तरतूद यांची माहिती जनतेसमोर येणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची शेती, आदिवासी वाड्यांमधील पिण्याच्या पाण्याची गरज आणि भविष्यातील पाणीटंचाई यांचा विचार न करता प्रकल्पाचे नियोजन होता कामा नये. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला. प्रकल्पाच्या गरजा पूर्ण करताना स्थानिकांच्या पाण्याच्या हक्कांशी तडजोड होणार नाही, याची ठोस हमी सरकारने द्यावी, अशी मागणीही शेकापने केली.

प्रकल्पासाठी ६४० हेक्टर वनजमिनीवरील वृक्षतोडीचा मुद्दा चर्चेत आला आहे. कर्जत पर्यावरण बचाव समितीने परिसरात तब्बल ३ लाख झाडे असल्याचा दावा केल्याने वृक्षतोडीच्या व्याप्तीबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. नेमकी किती झाडे तोडली •➤पान २ वर

वे|ध|क

फरशी डोक्यात घालून मारहाण

पनवेल : ग्रॅनाइटच्या फरशीच्या पट्टीने डोक्यात वार करत एका व्यक्तीला गंभीर जखमी केल्याप्रकरणी संदीप ढवळे (५६) यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विचुंबे येथील विनीत पाटील हे सोसायटीच्या पार्किंगमध्ये सचिव मुळे यांच्यासोबत जात होते. यावेळी संदीप ढवळे यांनी पाटील यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर पार्किंगमध्ये असलेल्या ग्रॅनाइटच्या फरशीची पट्टी उचलून त्यांच्या डोक्यात मारली. या हल्ल्यात पाटील गंभीर जखमी झाले. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेल्या प्रीतम ठाकूर यांनाही फरशीच्या पट्टीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल-कळंबोली रेल्वे मार्गावर अपघात

पनवेल : पनवेल ते कळंबोली रेल्वे स्थानकादरम्यान डाउन रेल्वे मार्गावर मालगाडीची धडक लागून ३२ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. गंभीर जखमी झालेल्या तरुणाला पोलिसांनी उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या मृत तरुणाची उंची सुमारे ५ फूट ६ इंच असून, त्याची शरीरयष्टी सडपातळ आहे. त्याने आकाशी रंगाच्या निळ्या व हिरव्या रंगाच्या पट्ट्यांचा फुल बाह्यांचा शर्ट आणि राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट परिधान केली होती. तसेच, त्याच्या •➤पान २ वर

शिकारीच्या उद्देशाने आलेल्यांवर कारवाई

मुरुड-जंजिरा : मुरुड तालुक्यातील तेलवडे येथील टक्का आदिवासी वाडी भागात लागूनच असणाऱ्या जंगल परिसरात शिकारीसाठी येणाऱ्या दोन जणांना ताब्यात घेण्यात मुरूड पोलिसांना यश आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टक्का आदिवासी वाडी परिसरात काही लोक शिकार करण्यासाठी येणार असल्याची माहिती मुरुड पोलिसांना मिळाली होती. त्याप्रमाणे या भागात अगोदरच सापळा रचण्यात आला. यावेळी संशयीत सफेद रंगाची महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी दिसताच मुरुड पोलिसांकडून त्या गाडीची कसून तपासणी करण्यात आली. यावेळी गाडीमध्ये एक सिंगल बोअर व एक डबल बोअर अश्या •➤पान २ वर

नैना प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर लवकरच बैठक

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

गेल्या १३ वर्षांपासून नैना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत नैना प्रकल्पग्रस्त उत्कर्ष समिती पनवेलच्यावतीन रविवारी (दि.२५) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यात आली. यावेळी त्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन मुख्यमंत्री यांनी स्वीकारून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर लवकरच बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

या निवेदनातून नैना प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी, हक्क आणि भवितव्याशी संबंधित विविध प्रश्नांवर लक्ष वेधण्यात आले.



- बाळाराम पाटील यांच्यासह प्रकल्पग्रस्तांचा पाठपुरावा
- १३ वर्षांच्या संघर्षानंतर न्यायाची अपेक्षा

गेल्या १३ वर्षांपासून प्रकल्पग्रस्त शेतकरी आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करीत आहेत. या प्रश्नांची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन प्रकल्पग्रस्तांना दिलासा द्यावा आणि त्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले •➤पान २ वर

कुरुळमध्ये विकासकामांचा शुभारंभ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून मतदारसंघात विविध विकासकामांना गती मिळत असून, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर दिला जात आहे. याच अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील कुरुळमध्ये चित्रलेखा पाटील यांच्या विशेष प्रयत्नांतून, तसेच ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अवधूत पाटील आणि ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सिमेंट-काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ शनिवारी (दि.२५) चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

या शुभारंभप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे पंचायत समिती माजी सभापती सुरेश पाटील, माजी सरपंच प्रकाश पाटील, ॲड. सतीश नाईक, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अवधूत पाटील, रेश्मा पाटील तसेच कुरुळमधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचे विशेष प्रयत्न



या मतदारसंघातील गावागावात विकासकामे पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासोबतच आवश्यक विकासकामांसाठी पाठपुरावा केला जात आहे. ग्रामीण भागातील रस्ते हे गावाच्या विकासाचे महत्त्वाचे माध्यम असून, नागरिकांची दळणवळणाची सुविधा अधिक सुलभ होण्यासाठी चांगल्या दर्जाचे रस्ते असणे आवश्यक आहे. दरम्यान, सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या या कामामुळे स्थानिक नागरिकांना दिलासा मिळणार •➤पान २ वर

रिझर्व्ह बँकेकडून आरडीसीसीच्या कार्याची दखल

ग्राहक सेवा, शासकीय योजनेमध्ये आदर्श निर्माण केल्याचा गौरव

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्यावतीने पेण येथे बँकिंग सुविधा, आर्थिक साक्षरता आणि विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रिझर्व्ह बँकेचे मुंबई येथील प्रादेशिक संचालक राकेश कुमार श्रीवास्तव आणि उपमहाव्यवस्थापक डॉ. ज्योती सक्सेना यांच्याकडून रायगड जिल्ह्यातील बँकिंग सेवांचा आढावा घेताना जिल्हा बँकेच्या कार्याची दखल घेत बँकेच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक तथा राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक विवेक नाचणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्यासह विविध बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर रिझर्व्ह बँकेचे प्रादेशिक संचालक राकेश कुमार श्रीवास्तव यांनी उद्घाटनपर भाषण केले. रायगड जिल्हा बँकेच्या सुनिता पाटील या सह अनेक लाभार्थ्यांना विविध योजनांच्या धनादेश वितरणाचाही कार्यक्रमात समावेश होता.



या कार्यक्रमातील वक्त्यांनी रायगड जिल्ह्यात बँकिंग सुविधा पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ग्राहकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविणे, बँकिंग सेवांचा अधिकाधिक प्रसार करणे आणि विविध •➤पान २ वर

तळोजात मध्यरात्री गोळीबार

। पनवेल । प्रतिनिधी ।

लिफ्ट मेंटेनन्सचे कंत्राट आणि जुन्या आर्थिक व्यवहारांवरून झालेल्या वादातून तळोजा फेज-२ मधील शिवाजी चौक परिसरात गोळीबाराची घटना घडली. यावेळी आरोपींनी लोखंडी रॉड आणि लाकडी बांबूने तिघांना मारहाण केल्यानंतर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. या घटनेत विशाल शिंदे आणि सचिन डांगे हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी सागर डांगे, आकाश डांगे, गणेश लावरे, अनिकेत नरवाडे, रुद्र बारवकर यांच्यासह अन्य तीन अज्ञात व्यक्तींविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती यापूर्वी भागीदारीत लिफ्ट मेंटेनन्सची कंत्राटे घेत होत्या. मात्र, आर्थिक व्यवहारांवरून त्यांच्यात मतभेद झाल्यानंतर ते वेगळे झाले. त्यानंतर कंत्राट मिळवण्यावरून त्यांच्यात वाद सुरू होते. शुक्रवारी मध्यरात्री विशाल शिंदे, सचिन डांगे आणि सौरभ दुंबरे हे तिघे तळोजा फेज-२ मधील शिवाजी चौकाजवळील मारवा इमारतीखाली उभे होते. यावेळी लिफ्ट मेंटेनन्सचे कंत्राट मिळवण्यावरून तसेच जुन्या भागीदारीतील आर्थिक व्यवहारांवरून त्यांच्यात वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले आणि त्यानंतर गोळीबार करण्यात आला. या घटनेमुळे तळोजा परिसरात खळबळ उडाली असून, फरार आरोपींचा शोध तळोजा पोलिसांकडून घेतला जात आहे.

जुन्या वादातून तरुणाची हत्या



। कळंबोली । प्रतिनिधी ।

रबाळे एमआयडीसीतील यादव नगर परिसरात जुन्या वादातून एका २५ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दिवाकर यादव असे मृत तरुणाचे नाव असून, पैशांच्या देवाणघेवाणीवरून निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर गुरुवारी रात्री रक्तरंजित संघर्षात झाले. या प्रकरणाचा छडा लावत रबाळे एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या काही तासांत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. प्राथमिक •➤पान २ वर

अलिबागेत रंगला 'आशा सखी, खेळ पैठणीचा' चित्रलेखा पाटील यांच्याकडून विशेष सन्मान

आशा सेविकांच्या कार्याचे कौतूक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा मजबूत ठेवण्याचे काम आशा सखी खंबीरपणे करतात. शासनाच्या सर्व योजना घराघरात पोहचविण्यासाठी धडपडत असतात. मात्र, वेगवेगळ्या जाहिरातीवर निधी उधळण्यास शासनाकडे पैसे आहेत. परंतु, जिवाची पर्वा न करता, आरोग्य सेवा देण्याचे काम करणाऱ्या आशा सखींना तो मानपान देण्यास सरकार उदासीन असल्याची खंत शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी आशा सखींच्या कार्याचे कौतूक करीत शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी विधान परिषदेमध्ये आवाज उठवून अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढविण्यासाठी प्रयत्न केले. त्याच पद्धतीने आशा सखींना चांगले मानधन, प्रवास भत्ता व इतर सुविधा मिळाव्यात यासाठी लढा देणार असून, त्यांच्या पाठीशी कायम असल्याचा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. •➤पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

काजल डाकी ठरल्या 'पैठणी क्विन'

शेकाप तालूका महिला आघाडीच्यावतीने अलिबागमध्ये 'आशा सखी, खेळ पैठणीचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खेळ व मनोरंजानासह 'पैठणी क्वीन' हा अगळावेगळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात बॉटल जिंकणे, पत्रावळी, रिल्स आणि ग्लास घेण्याची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये काजल डाकी या प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्याने त्यांना 'पैठणी क्वीन'चा सन्मान देऊन गौरविण्यात आले. तसेच, द्वितीय क्रमांक जागृती पाटील यांनी मिळवला असून, त्यांनाही पैठणी देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर उपस्थित दोनशेहून अधिक महिलांचा साडी देऊन सन्मान करण्यात आला.

(संबंधित छायाचित्र पान ३ वर)

निष्काळजीपणाचा फटका; हजारो लीटर पाणी वाया

चौलमळा येथे रस्त्याच्या खोदकामात पाइपलाइन फुटली

। चौल । प्रतिनिधी ।

आधीच पाणीटंचाईचे संकट, त्यात एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि दुसरीकडे निष्काळजीपणामुळे हजारो लीटर पाण्याची नासाडी झाल्याची घटना अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथे घडली. एमएसआयडीसीकडून सुरू असलेल्या रस्त्याच्या खोदकामादरम्यान जेसीबीने पाण्याची पाइपलाइन फोडल्याने पाणी रस्त्यावर वाहून गेले. शनिवार, दि.२४ ऑक्टोबर रोजी रात्री घडलेल्या या प्रकारामुळे पाणीटंचाईच्या काळात विकासकामांच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चौलमळा येथील कृष्णादेवी मंदिराजवळ रात्रीच्या वेळी जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याचे खोदकाम सुरू असताना ही पाइपलाइन फुटली. परिणामी, हजारो लीटर पाण्याची नासाडी झाली आहे. आधीच •➤पान २ वर



> पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना, अशा प्रकारे पाण्याची नासाडी होणे ही गंभीर बाब आहे. रस्त्याच्या दुरुस्तीला आमचा विरोध नाही; मात्र, ज्या गावात काम करण्यात येणार आहे, त्या गावातील ग्रामस्थांशी विचारपूस करून काम केल्यास होणारे नुकसान निश्चितच टाळता येईल. कारण, पाण्याची नासाडी होणे म्हणजे पाणीसंकट स्वतःहून ओढवून घेण्यासारखे आहे.
> – रवींद्र घरत, अध्यक्ष, चौलमळा

नवान्न तोरणाचा मातोश्रीवर सन्मान

■ सुरेंद्र म्हात्रेंच्या पुढाकारातून कृषीपरंपरेचा गौरव



। अलिबाग । प्रतिनिधी ।

कोकणच्या मातीशी नाळ जोडणारी कृषिपरंपरा, नव्या पिकाबद्दलची कृतज्ञता आणि संस्कारांचा वारसा जपत शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असलेल्या मातोश्रीवर नवान्न पौर्णिमेनिमित्त नवअन्न तोरण बांधण्याचा पारंपरिक सोहळा उत्साहात पार पडला. शेती, निसर्ग आणि समृद्धीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमातून परंपरेप्रती असलेली आस्था पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या पुढाकारातून गेल्या अनेक वर्षांपासून मातोश्रीवर नवअन्न तोरण बांधण्याची परंपरा जपली जात आहे. केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसलेला हा सोहळा बळीराजाच्या कष्टांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि कोकणच्या कृषिसंस्कृतीचे जतन करणारा उपक्रम ठरत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाने यंदाही नवान्न तोरण बांधण्यात आले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी शुभेच्छा व्यक्त करत बळीराजाच्या जीवनात भरभराट नांदावी, शेतीला चांगले दिवस यावेत आणि प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या घरात समृद्धी नांदावी, अशी भावना व्यक्त केली.

कोकणात नवान्न पौर्णिमेला विशेष सांस्कृतिक महत्त्व आहे. नव्या धान्याच्या आगमनानिमित्त निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, धान्यलक्ष्मीचे स्वागत करणे आणि कृषीसमृद्धीची कामना करणे, ही या परंपरेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. शेतकऱ्यांच्या घामातून उभ्या राहिलेल्या पिकाचा सन्मान करणारा हा उत्सव ग्रामीण जीवनातील निसर्गनिष्ठा आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करतो. मातोश्रीवरील नवान्न तोरणाचा सोहळा म्हणजे परंपरेचे केवळ औपचारिक पालन नव्हे, तर नव्या पिढीपर्यंत कृषिसंस्कृतीचा वारसा पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. बदलत्या काळातही अशा परंपरा जपल्या जाणे, हे सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवांचे प्रतीक मानले जाते. बळीराजाच्या कष्टांना सन्मान देत श्रद्धा, संस्कार आणि संघटनभावनेचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमातून नवान्न परंपरेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले. या सोहळ्याला रायगड जिल्हा संपर्क प्रमुख संजय कदम, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, चौल विभागप्रमुख मारुती भगत, ज्येष्ठ शिवसैनिक विकास ठाकूर, संपर्कप्रमुख उपकार खोत, वाहतूक सेना सचिव प्रणव म्हात्रे, युवासेना शाखा अधिकारी अजिंक्य मिसाळ, तालुका सचिव तेजस शिंदे, शिवसैनिक प्रतीक नाईक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

अल्पवयीन दुचाकी चालकांचा वावर

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहरामध्ये सध्या अल्पवयीन दुचाकी चालकांचा खुलेआमपणे वावर सुरू आहे. शहरामध्ये केवळ एकच वाहतूक पोलीस तैनात असल्यामुळे शाळेत जाणारी मुले सुद्धा आपल्या आई-वडिलांनी दिलेली दुचाकी घेऊन बिनधास्त शाळेत जात असतात. जे विद्यार्थी शाळेत दुचाकी घेऊन येतात, त्यांच्यावर शाळा प्रशासनाने देखील वचक ठेवणे गरजेचे आहे. एक मुलगा दुचाकी घेऊन शाळेत येतो, बघितल्यानंतर बाकीचे विद्यार्थी सुद्धा आपल्या पालकांकडे दुचाकी मिळावी यासाठी हट्ट करत असतात. श्रीवर्धन शहरापासून जीवना बंदर हा विभाग मोठ्या अंतरावर आहे. विशेष करून या ठिकाणचे अनेक विद्यार्थी शाळेमध्ये दुचाकी घेऊन येतात. त्यांचे वय १८ पेक्षा खूप कमी असून, त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा चालक परवाना नाही. अशांवर कारवाई करून त्यांच्या पालकांवरती गुन्हा दाखल करावा, जेणेकरून पालक लहान मुलांच्या हातात दुचाकी देणार नाहीत, अशी मागणी होत आहे.



रोहा तालुक्यात जलसंधारणाला गती

ग्रामस्थांच्या श्रमदानातून बंधाऱ्यांची उभारणी

। चणेरा । प्रतिनिधी ।

भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने जलसंधारणाच्या उपाययोजनांना गती दिली आहे. राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या नियोजनानुसार संपूर्ण जिल्ह्यात तालुकानिहाय वनराई बंधारे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत रोहा तालुक्यात १०० हून अधिक वनराई बंधारे उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून, सानेगाव ग्रामपंचायत येथे प्रशासन आणि ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात आले.

पाणीटंचाईच्या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी केवळ प्रशासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता नागरिकांनीही जलसंधारणाच्या कामात सहभागी होणे गरजेचे आहे. सानेगाव येथे प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन श्रमदानातून राबविलेला हा उपक्रम पाणी बचतीचा आणि लोकसहभागातून जलसंधारण करण्याचा संदेश देणारा ठरला. रोहा तालुक्यात नियोजित १०० हून अधिक वनराई बंधाऱ्यांच्या माध्यमातून पाणी अडविणे, पाणी जमिनीत मुरविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी स्थानिक जलस्रोतांना बळकटी देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. यावेळी राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, विजया पाशीलकर, संजय मांडलुस्कर, उर्वशी वाडकर, अमृता उंदरे पाटील, महारुद्र फरतडे, रणजीत लवटे, प्रसाद दगडे, कृषी सहाय्यक लंके, तेजश्री पाटील, संतोष दिवकर यांच्यासह महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

टोरंटविरोधात शेकाप मैदानात

जाणार, त्यासाठी कोणत्या प्राधिकरणाने परवानगी दिली आणि पर्यावरणीय मंजुरीच्या अटी काय आहेत, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक केवळ गरीब आदिवासींसाठीच आहे का? मोठ्या कंपन्यांसाठी वेगळे नियम आहेत का? असा सवाल उपस्थित करत वनविभागाने वृक्षतोडीशी संबंधित परवानग्या, आदेश आणि अधिकृत आकडेवारी सार्वजनिक करावी, अशी मागणी चित्रलेखा पाटील यांनी केली आहे. जंगलाच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेने या प्रश्नावर मौन न बाळगता आपली भूमिका स्पष्ट करावी, असेही
त्यांनी म्हटले.प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी आणि आदिवासी कुटुंबांच्या जमिनी, उपजीविका आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील अवलंबित्वावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. संभाव्य विस्थापन, भरपाई, पुनर्वसन आणि रोजगार याबाबत स्पष्ट माहिती नसताना प्रकल्प पुढे नेण्याची घाई कशासाठी, असा प्रश्न शेकापने उपस्थित केला आहे. स्थानिकांच्या हरकती विचारात घेतल्या आहेत का, बाधित कुटुंबांची संख्या किती आहे आणि त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था काय असेल, याची उत्तरे प्रशासनाने द्यावीत. विकासाच्या नावाखाली ज्यांचे जीवनमान आणि अस्तित्व पणाला लागणार आहे, त्यांनाच निर्णयप्रक्रियेपासून दूर ठेवणे योग्य नाही, अशी भूमिका चित्रलेखा पाटील यांनी मांडली. विकासाच्या नावाखाली जंगल, पाणी आणि आदिवासींचे हक्क दुर्लक्षित होता कामा नयेत. प्रकल्पाचा फायदा कोणाला होणार आणि त्याची किंमत कोण मोजणार, आणि त्याची किंमत कोण मोजणार, याचा स्पष्ट हिशेब जनतेला मिळालाच पाहिजे, अशी भूमिका शेकापने घेतली आहे. त्यामुळे सायडोंगर प्रकल्पाच्या निमित्ताने पर्यावरण संरक्षण आणि स्थानिकांच्या हक्कांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

भुमिपूजनाची घाई नको!

सायडोंगर प्रकल्पाच्या भूमिपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य दौऱ्याची चर्चा सुरू असताना शेकापने निषेधाचा इशारा दिला आहे. वृक्षतोडीच्या परवानग्या, पाणीवापर, पर्यावरणीय परिणाम आणि स्थानिकांच्या हक्कांबाबत स्पष्टता मिळाली नाही, तर काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवण्यात येईल, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे. प्रकल्पाच्या मंजुरीशी संबंधित कागदपत्रे आणि पर्यावरणीय अटी सार्वजनिक करणे, स्थानिकांच्या हरकतींवर उत्तर देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करणे, या मागण्या शेकापकडून करण्यात येत आहेत.

जनतेला हिशेब हवा

विकासाच्या नावाखाली जंगल, पाणी आणि आदिवासींचे हक्क दुर्लक्षित होता कामा नयेत. प्रकल्पाचा फायदा कोणाला होणार आणि त्याची किंमत कोण मोजणार, याचा स्पष्ट हिशेब जनतेला मिळालाच पाहिजे, अशी भूमिका शेकापने घेतली आहे. त्यामुळे सायडोंगर प्रकल्पाच्या निमित्ताने पर्यावरण संरक्षण आणि स्थानिकांच्या हक्कांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

आशा सेविकांच्या कार्याचे कौतूक

चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत शेतकरी कामगार पक्ष अलिबाग तालुका महिला आघाडीच्यावतीने रविवारी (दि.२५) स्नेहमेळावा आणि 'आशा सखी, खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात करण्यात आले होते. यावेळी चित्रलेखा पाटील संवाद साधताना बोलत होत्या.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड.मानसी म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, वृषाली ठोसर, तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, रोशनी मोकल, ॲड.अश्वीनी ठोसर, ॲड.निलम हजारे, संजना कीर, आक्षी सरपंच रश्मी पाटील आणि मुळे सरपंच रोहिणी पाटील आर्दीसह शेकापच्या विविध आघाडीच्या महिला पदाधिकारी, सदस्य, अलिबाग नगरपरिषदेच्या आजी-माजी नगरसेविका, आशा सेविका व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या संकल्पनेतून शेकाप महिला आघाडीच्यावतीने आशा सेविकांसाठी स्नेह मेळावा आणि आशा सखी सारखा चांगला उपक्रम राबविण्यात आला आहे. कामांमध्ये व्यस्त असताना स्वत:कडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. त्यामुळे व्यक्त होण्याबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अशा सखींसाठी खेळ आणि मनोरंजनांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तालुका महिला आघाडीच्या प्रमुख नागेश्वरी हेमाडे आणि त्यांच्यी टीमने एक आगळा वेगळा उपक्रम राबविला आहे. रविवारी सुट्टीचा दिवस असतानाही आशा, प्रेम, बांधिलकी ठेवून सर्व महिला या कार्यक्रमांच्या माध्यमातून एकत्र आल्याचा आनंद आहे. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता, घरोघरी जाऊन रुग्णांचा शोध घेणे, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करणे, अशा अनेक प्रकारची कामे आशा सेविकांनी केली आहेत. त्यांचे समाजातील योगदान खऱ्या अर्थाने मोलाचे राहिले आहे. जितक्या ताकदीने व आवडीने खेड्यापाड्यात वाड्या वस्त्यांमध्ये जाऊन आशा सेविका काम करतात, त्या अपेक्षेने त्यांना मानपान शासनाकडून दिला जात नाही, ही मोठी खंत आहे.

शासनाने त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचा सन्मान करणे गरजेचे आहे. गोरगरीबांसह अन्यायग्रस्तांच्या पाठीशी शेतकरी कामगार पक्ष कायमच आहे. शेकापचे सरचिटणिस जयंत पाटील यांनी विधान परिषदेमध्ये आवाज उठवून अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याच पद्धतीने आशा सेविकांना चांगले मानधन, प्रवास भत्ता व इतर सुविधा मिळाव्यात यासाठी लढा देणार आहे. आशा सेविकांचा त्यांचा मान व हक्क मिळाला पाहिजे ही शेकापची भुमिका आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

कुरुळमध्ये विकासकामांचा शुभारंभ

असून, गावातील पायाभूत सुविधांच्या विकासाला हातभार लागणार आहे. दरम्यान, कुरुळ येथील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ हा स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित मानले जात आहे. स्थानिक नागरिकांच्या सहभागातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून गावाच्या विकासाला चालना मिळत असून, कुरुळमधील या रस्त्याच्या कामामुळे विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

नैना प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर लवकरच बैठक

आणि खासदार श्रीरंग बारणे यांनाही निवेदन सादर करून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. यावेळी शासनस्तरावर बैठक होऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यासह काशीनाथ पाटील, वामन शेळके, तालुका चिटणीस राजेश केणी, सभापती देवेंद्र मढवी, मनीषा चोरघे, नंदकुमार पाटील व शेखर शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, नैना प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांनी बैठक घेण्याचे दिलेले आश्वासन महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, केवळ बैठक न होता शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घेऊन त्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची सोडवणूक होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याची भूमिका समितीच्यावतीने स्पष्ट करण्यात आली.

जुन्या वादातून तरुणाची हत्या

माहितीनुसार, दिवाकर यादव आणि योगेश जयस्वाल यांच्यात पैशांच्या देवाणघेवाणीवरून जुना वाद सुरू होता. याच वादातून गुरुवारी रात्री दोन्ही गट आमनेसामने आले. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी दिवाकर यादव याच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य ओळखून रबाळे एमआयडीसी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या तीन तासांत योगेश जयस्वाल ऊर्फ बॉबी, कृष्णा सिंह आणि विवेक यादव ऊर्फ छोटू या तिघांना ताब्यात घेतले. मुख्य आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणात योगेश जयस्वाल आणि कृष्णा सिंह यांना बेड्या ठोकण्यात आल्या असून, विवेक यादव हा जखमी असल्याने त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपचारानंतर त्यालाही अटक केली जाणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास कठाळे यांनी दिली. मित्राच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे यादव नगर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. जुन्या वादातून घडलेल्या या हत्येप्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

रिझर्व्ह बँकेकडून आरडीसीसीच्या कार्याची दखल

योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सहकारी बँकिंग क्षेत्रात राबवत असलेल्या विविध योजना आणि ग्राहकाभिमुख उपक्रमांची दखल घेण्यात आली. रिझर्व्ह बँकेच्या उपमहाव्यवस्थापक डॉ. ज्योती सक्सेना यांनी आपल्या भाषणात रायगड जिल्हा बँकेच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले. रायगड जिल्हा बँक ग्राहक सेवा आणि नियमांचे पालन याकडे केवळ व्यावसायिक जबाबदारी म्हणून न पाहता सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून काम करते, हा दृष्टिकोन इतर बँकांसाठी आदर्श असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देतानाच सामाजिक बांधिलकी जपण्याची बँकेची भूमिका कौतुकास्पद असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच, रायगड जिल्ह्यात कृषी कर्जपुरवठ्यात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आपले महत्त्वाचे स्थान कायम राखत असल्याचा विशेष उल्लेख रिझर्व्ह बँकेचे संचालक राकेश कुमार श्रीवास्तव यांनी केला. कृषी क्षेत्राला आर्थिक पाठबळ देण्यात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत त्यांनी बँकेच्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमाला बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक तथा राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक विवेक नाचणे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे महाव्यवस्थापक धनंजय सिंह राठौर, बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक बिचेंद्र चरण मल्लिक आणि बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाव्यवस्थापक सुनील शर्मा यांच्यासह विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह रायगड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या विविध सरकारी, खासगी आणि सहकारी बँकांचे प्रतिनिधी, प्रादेशिक प्रमुख तसेच विविध बँकांचे ग्राहक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. युनियन बँक ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक यांसह जिल्ह्यातील प्रमुख बँकांचे अधिकारी आणि प्रतिनिधीही उपस्थित होते.

निष्काळजीपणाचा फटका; हजारो लीटर पाणी वाया

पाण्यावाचून नागरिकांचे हाल सुरू असताना, मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहून गेले. निष्काळजीपणामुळे पाण्याची अशी नासाडी होत असल्याने संताप व्यक्त होत आहे. पाण्याची नासाडी रोखण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता निहाल चवकर यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना देत उमटे धरणावरून येणाऱ्या मुख्य जलवाहिनीचा पाणीपुरवठा रात्रीच बंद केला. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी झाल्याचे दिसून आले. दरम्यान, पाणी बंद केल्याने रविवारी सकाळी अनेक नागरिकांना पाण्यावाचून हाल सोसावे लागले.

मुख्य जलवाहिनी फुटल्याने तातडीची उपाययोजना म्हणून उमटे धरणावरून पाणीपुरवठा बंद करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांनी काम सुरू करण्यापूर्वी आम्हाला त्याची कल्पना दिल्यास, आमचा कर्मचारी त्या ठिकाणी पाठवून पुढील नुकसान टाळता येईल. – निहाल चवकर, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

पनवेलमध्ये एफडीएची धडक कारवाई

व्यक्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने २४ ऑक्टोबर रोजी कामोठे येथील मेसर्स अजफान इंटरनॅशनल रिटेल्स एलएलपी या आस्थापनावर कारवाई केली. या कारवाईदरम्यान आस्थापनातील विविध अन्नपदार्थांच्या साठ्याची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर इम्पोर्टेड चॉकलेट्स, ड्रायफ्रूट्स आणि एनर्जी ड्रिंक्स यांसह विविध अन्नपदार्थांचा समावेश असल्याचे समोर आले. अन्नपदार्थांच्या लेबलिंगमध्ये आढळलेल्या त्रुटी तसेच त्यांच्या गुणवत्तेबाबत निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर हा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात तरतुदींच्या उल्लंघनाच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली आहे. संबंधित अन्नपदार्थ मिसब्रँडेड असल्याचे तसेच निकृष्ट दर्जाचे असण्याचा संशय असल्याने नमुने व साठ्याबाबत आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पनवेल-कळंबोली रेल्वे मार्गावर अपघात

डाव्या हाताच्या मनगटावर जुन्या जखमेच्या दोन गोलाकार खुणा आहेत. या अनोळखी मृत तरुणाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. तरुणाबाबत किंवा त्याच्या नातेवाइकांबाबत कोणाला काही माहिती असल्यास तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक व्ही. व्ही. राऊत (मो. ९५७९५०१५०४) किंवा पोलीस उपनिरीक्षक श्रीकृष्ण वेदपाठक (मो. ९८७०१५७८५०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

शिकारीच्या उद्देशाने आलेल्यांवर कारवाई

दोन रायफल, तसेच १०४ जिवंत काडतुसे आणि वन्यजीव कापण्यासाठीची हत्यारे सापडून आली. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मुरुडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. क्रेसेन्ट लुकस डिमेलो (५९) व ग्राफिक क्रेसेन्ट डिमेलो (२३) अशी दोन संशयितांची नावे असून, हे दोघेही चेंबूर-मुंबई परिसरातील रहिवाशी आहेत.

कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड.
ई-निविदा सूचना (बांधकाम विभाग)
जावक क्रमांक/कनप/बांधकाम विभाग/२२२०/२०२६-२७, दि. २३/१०/२०२६
कर्जत नगरपरिषदेच्या वतीने कर्जत नगरपालिका हद्दीतील खालिल प्रमाणे विकास कामे करून घेण्याची आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	कर्जत नगरपरिषद हद्दीतील महावीर पेठ येथे सार्वजनिक शौचालय बांधणे.	१०,९३,१५४/-

सदर कामाची ई-निविदा, अटी व शर्ती आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रक व इतर तपशिलासह सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २६/१०/२०२६ सकाळी ११.०० वा पासून उपलब्ध होईल. त्याकामी इच्छुक ठेकेदारा कडुन निविदा मागविणे कामी शिफारस सादर

सही/-
(कोमल कराळे)
मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत

सही/-
(पुष्पा हरिश्चंद्र दगडे)
नगराध्यक्षा कर्जत नगरपरिषद, कर्जत

कर्जत नगरपरिषद, कर्जत
जावक क्रमांक/कनप/बांधकाम विभाग/२२२८/२६-२७ दिनांक २३/१०/२०२६
जाहिर निविदा सुचना

कर्जत नगरपरिषदेस खालील प्रमाणे विकास कामासाठी निविदा बी-१ पद्धतीने मागवित आहे. इच्छुक ठेकेदाराने कामाचे समोर नमुद केलेली निविदा फॉर्मची किंमत नगरपरिषदेचे लेखा शाखेत रोख भरणा करुन निविदा फॉर्म प्रति घेवून जाण्याची व्यवस्था करवी. कोऱ्या निविदा फॉर्म दि. २६/१०/२०२६ ते ०५/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पुरविल्या जातील. ठेकेदारांनी आपले कडील सिलबंद निविदा दि. ०६/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत दोन लिफाफा पद्धतीने नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद यांचे नावे सादर कराव्यात. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

अनु क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम (धनाकर्षा मार्फत)	कामाची मुदत	कोऱ्या निविदा फॉर्म फी
१	कर्जत नगरपरिषद हद्दीतील मच्छी मार्केट मधील शौचालय दुरुस्त करणे.	६,८७,८७७/-	६,८७९/-	६ महीने	५९०/-
२	कर्जत येथील जैन मंदिराच्या मागील मोकळ्या जागेत सुशोभिकरण करणे.	८,५०,४७८/-	८,५०५/-	६ महीने	५९०/-

१. इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे ((D.D) किंवा अकाऊंट पेऑर्डरने भरावयाचे आहे.
(D.D पुढील प्रमाणे असावा (Chief Officer Karjat Municipal Payable at Mumbai)
२.ज्या ठेकेदाराची निविदा नगरपरिषद मंजुर करेल त्या ठेकेदाराला १% सुरक्षा अनामत रोखीने कार्यादेश स्विकारणे पुर्वी व ८% बिलातुन भरणा करावी लागेल. तसेच स्वखर्चाने योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
३. लखोटा क्र. १ मध्ये आवश्यक ती कागदपत्रे न आढळल्यास क्र. २ उघडला जाणार नाही.
४. निविदा फॉर्म पोष्टाने पाठविल्या जाणार नाहीत.
५. मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड केलेल्या व साक्षांकित अटी व शर्ती युक्त निविदांचा विचार केला जाणार नाही.
६. सविस्तर निविदा सुचना / दरपत्रक पुरविणे बाबत अटी शर्ती नगरपरिषद कार्यालयांत पहावयास मिळतील.
लखोटा क्र. १ :- १) नोंदणी व परवाने प्रमाणपत्र (ठेकेदाराचे रजिस्ट्रेशन), २) इसारा रक्कमेचा धनाकर्ष व एक झेरॉक्स प्रत, ३)आयकर दाखला (IT Return) मागील एक वर्षाचा ४) GST प्रमाणपत्र, ५) कामगार प्रॉव्हीडंड फंड (ESLC) दाखला, ६) संविधेमध्ये पदाधिकाऱ्यांच्या सहभाग नसल्याबद्दलचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट अ) ७) पॅनकार्डची झेरॉक्स प्रत. ८)आधार कार्ड ०९) कामाचा अनुभव व पात्रता समर्थनार्थ कागदपत्रे, व इतर सदर कागदपत्रे दिलेल्या क्रमानुसार लावून पेजींग करणेत यावे व अनुक्रमणिका कागदपत्रांच्या वरील भागात लावावी
लखोटा क्र. २ :- बी - १ नमुना फॉर्म.

सही/-
(कोमल कराळे)
मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत

सही/-
(पुष्पा हरिश्चंद्र दगडे)
नगराध्यक्षा कर्जत नगरपरिषद, कर्जत



प्रथम क्रमांक
१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक
१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

समाजासाठी आशा सेविकांचे योगदानः ॲड.मानसी म्हात्रे

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

आशा सेविकांसाठी समाजाचे खुप मोठे देणे आहे. प्राथमिक स्वरुपातील आरोग्य सेवा उभी ठेवण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कोरोना काळात आशा सेविकांनी समाजासाठी दिलेले योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे. आशा सेविकांसह सर्व क्षेत्रातील महिलांनी या कालावधीत काम केले. तसेच, समाजामध्ये सुरु असलेला दृष्ट प्रवृत्ती आणि विचारांचा अंधार घालविण्यासाठी निश्चितपणे आशा सेविकांचे योगदान खुप मोठे ठरणार आहे, असा विश्वास शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी व्यक्त केल.



चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत शेतकरी कामगार पक्ष अलिबाग तालुका महिला आघाडीच्यावतीने रविवारी (दि.२५) स्नेहमेळावा आणि 'आशा सखी, खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन अलिबागमध्ये करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

त्या पुढे म्हणाल्या की, आशा सेविकांसाठी शेकाप महिला आघाडीच्यावतीने एक चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून खेळ व मनोरंजनासह पैठणी क्वीन बनण्याची संधी मिळाली आहे. आशा सेविकांसाठी समाजाचे खुप मोठे देणे आहे. प्राथमिक स्वरुपातील आरोग्य सेवा उभी ठेवण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कोरोना काळात आशा सेविकांनी समाजासाठी दिलेले योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे. आशा सेविकांसह सर्व क्षेत्रातील महिलांनी या कालावधीत काम केले आहे. त्यामुळे समाजामध्ये सुरु असलेला दृष्ट प्रवृत्ती आणि विचारांचा अंधार घालविण्यासाठी निश्चितपणे आशा सेविकांचे योगदान खुप मोठे ठरणार आहे, असा विश्वास देखील ॲड. मानसी म्हात्रे यांनी व्यक्त केला.

खेळ, मनोरंजनातून लुटला आनंद

शेकाप अलिबाग तालुका महिला आघाडी टीम आणि चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत 'आशा सखी, खेळ पैठणीचा' कार्यक्रम अलिबागमधे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात आशा सेविकांसोबत संवाद साधण्याबरोबरच खेळ, मनोरंजन आणि क्वीन पैठणीची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आशा सेविकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. गाण्यांच्या माध्यमातून स्पर्धा घेण्यात आली. यावेळी अनेक महिलांचा भेटवस्तू देऊन गौरवण्यात आला. तसेच सहभाग घेतलेल्या आणि वेगवेगळ्या फेऱ्यांमध्ये विजेत्या ठरलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. खेळासह मनोरंजनातून अनेक महिलांनी आनंद लुटला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संदीप जगे आणि गुड्ड्या जाधव यांनी केले.

(छायाचित्र : समीर मालोदे)











































पाचशे कोटींची भानगड

कोणे एकेकाळी बोफोर्सचा कथित भ्रष्टाचार देशात गाजला. या कंपनीच्या तोफा विकत घेतल्या जाव्यात म्हणून भारतात कोणाला तरी लाच दिली गेली असा धुरळा उडाला. या कथित लाचेची रक्कम होती ६४ कोटी रुपये. त्यानंतर पाच-सात वर्षात एन्रॉन कंपनीनेही प्रशिक्षणाच्या नावाखाली लाच दिली असा आरोप झाला. ही रक्कम होती ६० कोटी. या सगळ्या गेल्या शतकातल्या गोष्टी झाल्या. आता आपण नितीन गडकरींच्या शतकात आहोत. गडकरीभाऊंनी आपल्याला रस्त्यांच्या प्रकल्पांचे हजार कोटी, लाख कोटी असे आकडे ऐकायची सवय लावली आहे. त्याच प्रमाणात भानगडींमधल्या आकड्यांचीही चलनवाढ झाली आहे. परवा मनोज जरांगे पाटील यांनी एक ऑडिओ क्लिप ऐकवली. त्यात जरांगे यांना देण्यासाठी एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांच्याकडे ५०० कोटी रुपये दिले आहेत असे वक्तव्य एका महिलेच्या तोंडी होते. त्यावरून राज्यात सध्या मोठा गदारोळ उडाला आहे. तीस वर्षांमध्ये झालेली हीच ती प्रगती आणि सब का साथ सब का विकास आहे. एकेकाळी तेव्हाच्या पंतप्रधानांवर ६४ कोटींचे आरोप होत होते. आता जरांगे पाटलांसारख्या कोणतेही पद नसलेल्यांना पाचशे कोटी देण्याची व्यवस्था केल्याची चर्चा चालू आहे. जरांगे यांनी दसरा मेळाव्यात याबाबत पहिल्यांदा आरोप केले. त्यावेळी एकनाथ शिंदे गटाने पुरावे द्या अशी मागणी केली. जरांगे यांनी तत्परतेने ही ऑडिओ क्लिप ऐकवली. भाजपच्या सोशल मिडिया विभागात काम करणाऱ्यांचा आवाज या क्लिपमध्ये आहे. याखेरीज मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या श्वेता शालिनी या एका बाईंसारखा आवाजही यात आहे. किंबहना, जरांगे यांना देण्यासाठी ५०० कोटी देण्याची बात हा या बाईंच्या आवाजातच आहे. सहज दोन-पाच हजार रुपये देणगी दिलेली असावी तसे पाचशे कोटी रुपये दिल्याचे त्या सांगत आहेत. इतके पैसे दिलेले असूनही जरांगे हे देवेंद्र फडणवीसांना व भाजपचा का लक्ष्य करीत आहेत याचा शोध घ्यायला हवा असे या बाईंचे सर्वसाधारण म्हणणे आहे.

कदमांच्या सुपाऱ्या

कोणतीही क्लिप आली की ती खोटी आहे, एआयने तयार केलेली आहे असे म्हणण्याची पध्दत पडून गेली आहे. भाजपच्या आशिष शेलार वगैरे नेत्यांनी तसे आरोप केलेच. पण गमतीचा भाग असा की, खुद्द मुख्यमंत्र्यांनी मात्र ही क्लिप खोटी आहे असे स्पष्टपणे म्हटले नाही. उलट विधानसभा निवडणुकीच्या पूर्वीची ही क्लिप आता अडीच वर्षांनी बाहेर येण्याचे कारण काय असा सवाल त्यांनी केला व त्याच्या चौकशीची घोषणा केली. आता त्या चौकशीतून कदाचित भाजपला हव्या त्या गोष्टी बाहेर येतील. बाकीच्या गैरसोयीच्या असतील तर त्यावर पडदा टाकला जाईल. क्लिप उघड झाल्यानंतर विरोधकांच्या आधी एकनाथ शिंदे यांच्या गटातूनच भाजपवर अधिक जोरदार हल्ला झाला. रामदास कदम यांनी गोळीबाराची बंदुक आपल्या खांद्यावर घेतली. शिंदे यांना संपवण्यासाठी भाजपने रचलेला हा कट आहे असा आरोप त्यांनी केला. जरांगे यांना हाताशी धरून हे सर्व केले जात असून ही क्लिप त्यांना कोणी दिली असा सवाल कदम यांनी केला. गंमत म्हणजे कदम यांनीही ही क्लिप खोटी आहे असे थेटपणे म्हटले नाही. त्यामुळे ५०० कोटी रुपयांचा मुद्दा खरा आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला. मग श्रीकांत शिंदे यांनी खुलासा केला आणि त्याचा इन्कार केला व मीदेखील शोधतोय की हे ५०० कोटी रुपये कुठे गेले असा टोला लगावला. रामदास कदम यांनी आपल्या आरोपांमध्ये प्रवीण दरेकर यांचेही नाव घेतले. मग दरेकर यांनी कदमांवर टीका केली. भाजपने सुपारी दिल्याची भाषा कदम यांनी करावी हा मोठा विनोद आहे असा दावा करून कदम यांच्या जुन्या सुपाऱ्या काढाव्या लागतील अशी धमकी दिली. मग भाजप आणि शिंदे सेनेच्या प्रवक्त्यांनी आपापली तोंडे यात साफ करून घेतली. असा सगळा कालवा झाल्यानंतर मग एकनाथ शिंदे यांना राज्यातील दुष्काळाची आठवण झाली. आरोप प्रत्यारोप नकोत, दुष्काळाच्या कामावर लक्ष द्या असे आवाहन त्यांनी केले.

शिंद्यांचे ओझे फेकण्याची तयारी

२०२४ मधील ही क्लिप आता बाहेर येण्याचे कारण काय हा सर्वांनाच पडलेला प्रश्न आहे. जरांगे यांचा बंदोबस्त करण्यासाठी शिंदे यांच्याकडे किंवा त्यांच्यामार्फत ५०० कोटी दिले गेले हा आरोप गंभीर आहे. आमच्या पक्षात असे पैसे दिले जात नसतात असे भाजप किंवा शिंदे सेनावाले म्हणत नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे. ही क्लिप खोटी आहे इतकेच ते म्हणतात. शिवाय याच क्लिपमध्ये ५०० कोटी रुपयांच्या पलिकडे आणखीही भयंकर भानगडी आहेत. क्लिपमधील संभाषण झाले तो काळ विधानसभा निवडणुकीपूर्वीचा आहे. त्यावेळी मालवणच्या किनाऱ्यावर उभारलेला आणि नरेंद्र मोदींनी अनावरण केलेला शिवाजीमहाराजांचा पुतळा पडला होता. त्यावरून फडणवीस सरकारवर जोरदार टीका सुरू होती. या पुतळ्याचा शिल्पकार आपटे हा बराच काळ फरारी होता. ज्याला चार-पाच फुटांपलिकडचे पुतळे करायचा अनुभव नाही अशा या आपटेला तो निव्वळ भाजप किंवा संघाच्या जवळचा आहे म्हणून कंत्राट दिले गेले होते. त्यातही मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाचा हात होता असा आरोप होत होता. या चर्चेवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे कसे वळवायचे, लव्ह जिहाद किंवा हिंदू विरुध्द मुस्लिम असे प्रश्न कसे पुढे आणायचे याची खुलेआम चर्चा या क्लिपमध्ये आहे. इतकेच काय भाजपचे नेते यासाठी पुरेसे बोलत नाहीत अशी तक्रार चालू होती. दुसरीकडे जरांगे यांचे आव्हान परतवण्यासाठी उदयनराजे भोसले यांच्यासह मराठा नेत्यांना कामाला लावायला हवे अशीही चर्चा केली जात होती. लोकांच्या प्रश्नांवर बोलूया किंवा त्यांचे प्रश्न सोडवून मते मिळवूया असे विचार यात मांडले जात नाहीत. केंद्रात व राज्यात सत्तेत येऊन भाजपला १० वर्षे झालेली असतानाची ही क्लिप आहे. तरीही भाजपला हिंदू विरुध्द मुसलमान करून लोकांचे मत असे कलुषित करूया हाच खेळ खेळावा लागतो हे या क्लिपवरून पुरेसे स्पष्ट होते. अन्य एखाद्या पक्षाला ५०० कोटींच्या मुद्द्याप्रमाणेच लोकांची माथी भडकवण्याचा मुद्दाही महत्वाचा वाटला असता. अशी भाषा आणि असले नियोजन आमच्या पक्षात होत नाही असे त्याने स्पष्ट केले असते. पण भाजपला तशी गरज वाटलेली नाही. याचे कारण आपण हेच केल्यामुळे सत्तेत टिकून आहोत हे भाजपला पुरेपूर ठाऊक आहे. दुसरीकडे शिंदे यांनी आता यावर अधिक टीका नको असे सांगून हे प्रकरण बंद करण्याचा पवित्रा घेतला आहे हेही सूचक आहे. ही क्लिप कोण्या एकाच माणसाच्या बोलण्याची नाही. एका बैठकीची आहे. त्यामुळे ती सहजासहजी तयार करणे सोपे नाही. जरांगे यांनी आता एकच क्लिप दिलेली असली तरी त्यांच्यामार्फत कदाचित आणखीही क्लिप्स बाहेर येण्याची शक्यता आहे. भाजपला २०२९ पूर्वी शिंदे यांचे ओझे झटकून टाकायचे आहे हे तर स्पष्टच आहे. त्यासाठी सबळ कारणे उभी करण्याची तयारी आतापासूनच सुरू झाली असावी असे मानायला जागा आहे. महाराष्ट्राचे राजकारण गटाराच्या अगदी खालच्या पातळीपर्यंत नेईपर्यंत महायुतीवाले आता थांबणार नाहीत.

विचार

इथेनॉलवाली कार, साखर-दागिन्यांमध्ये चढउतार

अलिकडच्या काळात चर्चेत राहिलेली बातमी म्हणजे शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी टोयोटा कार लवकरच बाजारात येणार आहे. दरम्यान, साखरेचे आणि सोन्या चांदीचे दर ग्राहकांमध्ये धास्ती निर्माण करत असल्याने त्याच्या अर्थकारणामध्ये डोकावून बघण्याची संधी समोर आली. अन्य महत्वाची बातमी म्हणजे परवडणारी घरे बांधणे कठीण ठरत असल्याचे रिअल इस्टेट व्यावसायिकांच्या मनोगतामधून उलगडले. या खास वृत्तांचा हा मागोवा.

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये चार लक्षवेधी क्षेत्रांमधून दखलपात्र बातम्या समोर आल्या. पहिली बातमी म्हणजे शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी टोयोटा कार लवकरच बाजारात येणार आहे. दरम्यान, साखरेचे आणि सोन्या चांदीचे दर ग्राहकांमध्ये धास्ती निर्माण करत असल्याने त्याच्या अर्थकारणामध्ये डोकावून बघण्याची संधी समोर आली. अन्य महत्वाची बातमी म्हणजे परवडणारी घरे बांधणे कठीण ठरत असल्याचे रिअल इस्टेट व्यावसायिकांच्या मनोगतामधून उलगडले.

देशात गेल्या काही वर्षांपासून पेट्रोलच्या किमती सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे वाहन मालकांमध्ये चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी टोयोटा इनोव्हा लवकरच देशात लॉन्च केली जाणार आहे. पेट्रोल वाहनांच्या तुलनेत ही गाडी चालवण्याचा खर्च अंदाजे २५ रुपये प्रति लिटरपर्यंत कमी राहील. भारताने परदेशी कच्च्या तेलावरील अवलंबित्व दूर करण्याच्या आणि पर्यावरणपूरक इंधनांना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने उचललेले हे सरकारी पाऊल एक ऐतिहासिक निर्णय मानले जात आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले, की त्यांना टोयोटाच्या शंभर टक्के 'फ्लेक्स-फ्युएल इनोव्हा'च्या लॉँच कार्यक्रमाचे आमंत्रण मिळाले आहे. हे 'फ्लेक्स-फ्युएल' वाहन पूर्णपणे शुद्ध इथेनॉलवर चालण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या कारमध्ये केवळ इथेनॉल इंजिनच नाही, तर एक प्रगत स्ट्राँग-हायब्रीड प्रणाली असेल. ही प्रणाली गाडी चालवताना ६० टक्क्यांपर्यंत ऊर्जा स्वतःच निर्माण करण्यास सक्षम आहे. या शक्तिशाली हायब्रीड संयोजनामुळे कारचा इंधन वापर लक्षणीयरीत्या कमी होईल. त्यामुळे खर्च २५ रुपये प्रति लिटर दरापर्यंत खाली येईल.

इथेनॉलची बाजारभावातील किंमत पेट्रोलपेक्षा खूपच कमी आहे. शिवाय, या 'टोयोटा फ्लेक्स-फ्युएल' कारमधील 'स्ट्राँग-हायब्रीड' तंत्रज्ञानामुळे सुमारे ४० टक्के अंतर ईव्ही मोडमध्ये प्रवास करणे शक्य होते. 'हायब्रीड इलेक्ट्रिक मोटर' कमी किमतीच्या इथेनॉल इंधनासोबत जोडली जाते, तेव्हा वाहन चालवण्याचा प्रति किलोमीटर खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो. या उत्कृष्ट इंधन कार्यक्षमतेमुळे पेट्रोल वाहनांच्या तुलनेत खरेदीदारांची मोठी बचत होईल. गडकरी यांनी इथेनॉल, बायो-सीएनजी, इलेक्ट्रिक आणि हायड्रोजन यांसारख्या पर्यायी इंधनांना प्रोत्साहन देण्याचे सातत्याने समर्थन केले आहे. इथेनॉलचे उत्पादन प्रामुख्याने ऊस, मका आणि पेंढ्यापासून केले जाते. बाजारात शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने आणल्याने देशाच्या कच्च्या तेलाच्या आयातीमध्ये अब्जावधी रुपयांची बचत तर होईलच; शिवाय देशातील शेतकऱ्यांनाही याचा थेट फायदा होईल. 'फ्लेक्स-फ्युएल' तंत्रज्ञान भविष्यात भारतीय वाहन उद्योगात संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्यास सज्ज आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये साखरेच्या दराने सर्वांनाच मोठा धक्का दिला होता. अचानक साखरेच्या दरात मोठी वाढ झाली होती. अशातच आता साखरेच्या दरात हळूहळू घसरण होत आहे. साखरेच्या किंमती कशा ठरवल्या जातात आणि त्यावर सरकारचे नियंत्रण नेमके काय असते? याची उत्सुकता अनेकांना लागली आहे. भारतात साखर केवळ एक खाद्यपदार्थ नाही, तर देशाच्या राजकारणाशी आणि जनतेच्या आर्थिक सुस्थितीशी निगडित एक अत्यंत संवेदनशील विषय आहे. सणासुदीचा काळ जवळ येताच, बाजारात साखरेच्या किमती अनेकदा चर्चेचा विषय बनतात. अलीकडेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले, की साखरेसारख्या कृषी उत्पादनांच्या किमती आता प्रामुख्याने जागतिक मागणी आणि पुरवठ्यानुसार ठरवल्या जातात आणि या बाबतीत सरकारची भूमिका मर्यादित आहे. साखरेच्या दराचा विषय उसाच्या किमतीपासून सुरु होतो. दरवर्षी, केंद्र सरकार उसासाठी वाजवी आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) निश्चित करते. ती शेतकऱ्यांना देणे बंधनकारक असते. २०२६-२७ च्या साखर हंगामासाठी, सरकारने ही किंमत प्रतिक्विंटल ३६५ रुपये निश्चित केली आहे. ती २०१९-२० मध्ये केवळ २७५ रुपये होती. उसाच्या किमतीतील वाढीचा साखरेच्या किमतींवर थेट परिणाम होतो, कारण कारखान्यांना आपला उत्पादन खर्च वसूल करावा लागतो.

साखर नियंत्रण आदेश २०२५ नुसार, सरकारला साखरेसाठी किमान विक्री किंमत निश्चित करण्याचा अधिकार आहे, म्हणजेच कारखाने या किमतीपेक्षा कमी किमतीत विक्री करू शकत नाहीत. या अधिकाराचा वापर आतापर्यंत फक्त दोनदाच करण्यात आला आहे. साखर कारखान्यांना तोटा होऊ नये आणि ते शेतकऱ्यांना वेळेवर पूर्ण पैसे देऊ शकतील, याची खात्री करणे, हा यामागील उद्देश आहे. देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा कमी होतो आणि भाव वाढतात, तेव्हा सरकार शुल्कमुक्त आयातीला परवानगी देऊन पुरवठा वाढवू शकते. त्यामुळे भावांवरील दबाव कमी होतो. याउलट, देशांतर्गत बाजारात साखरेचा साठा जास्त असेल आणि भाव कमी होऊ लागले, तर सरकार निर्यातीला प्रोत्साहन देऊन किंवा त्यावर निर्बंध घालून बाजारात संतुलन साधण्याचा प्रयत्न करते.

नवरात्र, दसरा आणि दिवाळीचा सण जवळ आला आहे. अशा सणासुदीच्या काळात सराफा बाजारासमोर मात्र मोठे आव्हान उभे राहिले आहे. एका बाजूला सोन्याच्या विक्रमी किमतींमुळे किरकोळ मागणीवर दबाव आला आहे, तर दुसऱ्या बाजूला सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात दागिन्यांच्या खरेदीबाबत अनिश्चिततेचे वातावरण पहायला मिळू शकते. 'इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन' (आयबीजेए)चे राष्ट्रीय सचिव सुरेंद्र मेहता यांच्या म्हणण्यानुसार सप्टेंबरमध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत सोन्याच्या विक्रीत आठ ते दहा टक्के घट झाली आहे. सोन्याच्या किमतीतील मोठी वाढ आणि जागतिक परिस्थितीबाबत असलेली अनिश्चितता यामुळे ग्राहक खरेदीबाबत सावध झाले आहेत. ग्राहकांमध्ये सध्या सोन्याच्या किमती आणखी खाली येतील का, याबाबत संभ्रम आहे. त्यामुळे काही ग्राहक दागिने खरेदी पुढे ढकलत आहेत तर काहीजण जुन्या दागिन्यांच्या एक्सचेंजचा पर्याय स्वीकारत आहेत. सोन्याच्या किमतीत गेल्या वर्षभरात मोठी वाढ झाली आहे. २४ कॅरेट शुद्ध सोन्याचा दर सुमारे ९८ हजार रुपयांवरून एक लाख ५७ हजार रुपये प्रति तोळ्यापर्यंत पोहोचला होता. म्हणजेच वर्षभरात किमतीत जवळपास ६० टक्के वाढ झाली. त्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या बजेटवर झाला. त्यामुळे दागिने खरेदी करताना ग्राहक कमी वजनाचे दागिने, कमी कॅरेटचे पर्याय किंवा एक्सचेंज ऑफरकडे वळत असल्याचे बाजारातील निरीक्षण आहे.

दरम्यान, अलिकडे सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली. चांदीच्या दरातही मोठी घसरण झाली. या घसरणीमागे काही प्रमुख आंतरराष्ट्रीय कारणे होती. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने जागतिक महागाईबाबत चिंता वाढली आहे. त्यातून अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'कडून व्याजदर आणखी वाढवले जाऊ शकतात, अशी बाजाराची अपेक्षा मजबूत झाली आहे. त्याच वेळी अमेरिकन ट्रेझरी बाँडचे उत्पन्न आणि डॉलर मजबूत झाल्याने व्याजाचे उत्पन्न न देणाऱ्या सोन्यासारख्या मालमत्तेवर दबाव आला. अमेरिका-इराण संघर्ष आणि होर्मुजशी संबंधित घडामोडींमुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत चिंता कायम आहे. तेलाच्या किमती वाढल्याने महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'कडून कठोर आर्थिक धोरण कायम राहण्याची शक्यता बाजाराने गृहीत धरली आहे. यामुळे सध्या सोन्याच्या सुरक्षित गुंतवणूक म्हणून असलेल्या मागणीवरही व्याजदर आणि बाँड यिल्डचा दबाव निर्माण झाला आहे.

रिअल इस्टेट उद्योगातील सर्वात मोठी संघटना असलेल्या 'क्रेडाई'ने म्हटले आहे, की महागडा कच्चा माल आणि इतर विविध करांमुळे विकासकांना परवडणारी घरे बांधणे कठीण होत आहे. स्वस्त अपार्टमेंटचा पुरवठा आणि मागणी वाढवण्यासाठी सरकारने प्रोत्साहन देण्याची मागणी संघटनेने केली आहे. 'क्रेडाई'चे अध्यक्ष शेखर पटेल यांनी सरकारने परवडणाऱ्या घरांची व्याख्या बदलून ४५ लाख रुपये प्रति सदनिकेची मर्यादा हटवावी, अशी मागणी केली आहे. पटेल यांनी सांगितले, की जमिनीच्या वाढत्या किमती, बांधकाम खर्चातील वाढ आणि घराच्या विक्री किमतीच्या ३० ते ५० टक्क्यांपर्यंत आकारले जाणारे कर हे परवडणाऱ्या घरांच्या पुरवठ्यातील प्रमुख अडथळे आहेत. विकासकांना विक्री किमतीच्या ३० ते ५० टक्के रक्कम केंद्र आणि राज्य सरकार तसेच महापालिकांना कराच्या स्वरूपात द्यावी लागते. या आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी सरकारसोबत काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या सहा महिन्यांमध्ये परवडणाऱ्या घरांचा पुरवठा आणि मागणी वाढवण्यासाठी धोरणात्मक निर्णय जाहीर होतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. निवासी मालमत्तांच्या एकूण विक्रीमध्ये परवडणाऱ्या घरांचा वाटा घटून १४ टक्क्यांवर आला आहे. चालू तिमाहीमध्ये घरांची चांगली विक्री होण्याची अपेक्षा आहे, असे ते म्हणाले.

चर्चा आजची

शेतकरी उद्ध्वस्त, सरकारचा वरदहस्त?

राकेश लोहार

टोरंट पॉवरच्या प्रकल्पासाठी हजारो झाडांची कत्तल, शेतजमिनींवर संकट आणि पर्यावरणाचा विनाश होत असेल, तर विकासाच्या नावाखाली नेमके कोणाचे हित साधले जात आहे? एकीकडे शेतकरी, आदिवासी आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे मोठ्या उद्योगांच्या प्रकल्पांसाठी निसर्ग आणि स्थानिक जनतेच्या भविष्याची किंमत मोजली जात आहे. मग हा विकास नेमका कोणासाठी आणि कोणाच्या बळावर? स्थानिकांचा विरोध असतानाही त्यांच्या माथी हा प्रकल्प मारण्याचा कुटिल डाव साधला जात आहे, असेच म्हणावे लागेल.

टोरंट पॉवरच्या प्रकल्पाला शेतकऱ्यांचा पहिल्या दिवसापासून विरोध आहे. हा विरोध अचानक उभा राहिलेला नाही, तर आपल्या जमिनी, शेती, निसर्ग आणि उदरनिर्वाहाचे साधन वाचवण्यासाठी शेतकरी करत असलेला संघर्ष आहे. ज्या जमिनीवर शेतकऱ्यांच्या पिढ्या जगल्या, ज्या मातीतून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो, त्याच जमिनीवर प्रकल्पाचे संकट उभे राहिल्यानंतर शेतकऱ्यांनी विरोधाची भूमिका घेतली. मात्र, शेतकऱ्यांच्या आक्षेपांना गांभीर्याने घेऊन त्यांचे समाधान करण्याऐवजी प्रकल्प पुढे नेण्याचा अट्टाहास केला जात असेल, तर सरकारच्या लोकहिताच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होणारच. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता, त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न देता आणि त्यांच्या भविष्याची हमी न देता, कोणता विकास साधला जात आहे?

एखाद्या आदिवासीने उदरनिर्वाहासाठी झाड तोडले, तर त्याच्यावर कायद्याचा बडगा उगारला जातो. मग टोरंट पॉवरच्या प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडण्यात आलीत, मग यावर वनविभागाची भूमिका काय? ६४० हेक्टर वनजमिनीचा प्रश्न असेल, तर या जमिनीवरील वृक्षतोडीला परवानगी कोणी दिली, कोणत्या कायदेशीर तरतुदींनुसार दिली आणि पर्यावरणीय परिणामांचा पुरेसा अभ्यास झाला आहे का, या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजेत. त्यासाठी स्थानिक आवाज उठवत आहेत, तो आवाज सरकारपर्यंत पोहोचत नाही का, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. नाही तर कायदा सामान्य माणसासाठी कठोर आणि बड्या उद्योगांसाठी लवचीक, असा संशय येणे, लोकशाहीसाठी नक्कीच घातक आहे.

शेतकरी आपल्या शेतातील एखादे झाड तोडतो, तेव्हा त्याला कायद्याचे धडे दिले जातात; मात्र हजारो झाडांच्या कत्तलीचा प्रश्न निर्माण होत असताना, संबंधित यंत्रणा मूग गिळून गप्प का? हे कळायला मार्गच नाही. परिस्थिती सगळीकडे सारखीच म्हणावी लागेल. कारण, आज रस्त्यांच्या रुंदीकरणातही हजारो झाडांवर कुऱ्हाड पडली आहे. पण, यावर कोणी चकार शब्द बोलायला तयार नाही. वृक्षतोडीच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडली पाहिजे. वृक्षतोडीला परवानगी देणारे आदेश, वनजमिनीच्या वापरासंदर्भातील मंजुरी, पर्यावरणीय परवानग्या आणि त्यातील अटी सार्वजनिक झाल्या पाहिजेत. अन्यथा, सामान्य माणसाला नियमांचा धाक आणि मोठ्या उद्योगांना मोकळे रान, अशीच भावना जनतेमध्ये बळावेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी एकीकडे पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि निसर्गरक्षणाचे संदेश देतात; मग दुसरीकडे ज्या प्रकल्पामुळे शेतकरी, आदिवासी आणि पर्यावरणावर संकट येत असेल, तर त्या प्रकल्पाच्या भूमीपूजनाला येऊन स्थानिक बाधितांच्या जखमेवर मीठ चोळण्याचेच काम त्यांच्याकडून होणार आहे, हेही तितकेच खरे. टोरंट पॉवरला केंद्र किंवा राज्य सरकारकडून नेमक्या कोणत्या परवानग्या मिळाल्या? त्यात लोकहिताला किती प्राधान्य दिले गेले आणि स्थानिक जनतेच्या आक्षेपांची दखल घेतली गेली का? सरकारचा वरदहस्त असल्याचा आरोप खरा आहे की नाही, हे कागदपत्रे आणि सरकारी निर्णयांतून स्पष्ट झाले पाहिजे; मात्र सत्ताधाऱ्यांनी मौन बाळगून जनतेच्या शंकांना बळ देऊ नये. टोरंट पॉवरच्या प्रकल्पाला शेतकऱ्यांचा पहिल्या दिवसापासून विरोध असताना त्यांच्या त्यांच्या तक्रारींवर कोणती कार्यवाही झाली? प्रकल्पामुळे शेती, पाणी, पर्यावरण आणि स्थानिकांच्या उपजीविकेवर होणाऱ्या परिणामांचा सखोल विचार झाला का? शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला का? हे प्रश्न केवळ शेतकऱ्यांचे नाहीत, तर लोकशाही व्यवस्थेच्या उत्तरदायित्वाचे आहेत. शेतकऱ्यांचा विरोध म्हणजे विकासाला विरोध, असा सोयीस्कर अर्थ काढून त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करणे चुकीचे आहे. कारण शेतकरी आपल्या जमिनीचा, आपल्या जगण्याचा आणि आपल्या पुढच्या पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न उपस्थित करत आहे.

वीज आणि उद्योगांचा विकास महत्त्वाचा आहेच; पण त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी, आदिवासींचे हक्क आणि पर्यावरण यांचा बळी देणे कितपत योग्य? उद्योगांना वीज मिळाली पाहिजे, अर्थव्यवस्थेला चालना मिळाली पाहिजे, रोजगारनिर्मिती झाली पाहिजे; मात्र या सगळ्याच्या मोबदल्यात स्थानिक जनतेनेच आपल्या अस्तित्वाची किंमत मोजायची का? विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या शेतीवर संकट येणार असेल, जंगल नष्ट होणार असेल आणि पर्यावरणाचा समतोल बिघडणार असेल, तर त्या विकासाच्या मॉडेलचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. स्थानिक जनतेचा विश्वास आणि सहभाग यांशिवाय विकासाचे दावे पोकळ ठरतात. विकासाच्या नावाखाली स्थानिक जनतेला विस्थापन, नुकसान आणि अनिश्चिततेच्या खाईत ढकलले जात असेल, तर तो विकास नसून अन्याय ठरतो. टोरंट पॉवरच्या प्रकल्पासंदर्भातील सर्व परवानग्या, वृक्षतोडीची अधिकृत आकडेवारी आणि पर्यावरणीय मंजुरी जनतेसमोर मांडली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आक्षेपांवर सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी आणि प्रकल्पाच्या समर्थनार्थ बोलणाऱ्यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत. लोकशाहीत उद्योगपतींना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, तसाच सरकारला जाब विचारण्याचा अधिकार शेतकऱ्यांनाही आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी आणि निसर्गाच्या किमतीवर उभा राहणारा विकास कोणाच्या फायद्याचा, याचा हिशेब जनतेला मिळालाच पाहिजे. टोरंट पॉवरच्या प्रकल्पाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे देणे ही सरकारची आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांचा पहिल्या दिवसापासून असलेला विरोध दुर्लक्षित करून जनतेच्या माथी निर्णय लादता येणार नाहीत. प्रश्न टोरंट पॉवरला विरोध करण्याचा नाही; प्रश्न आहे तो निसर्ग, शेतकरी आणि आदिवासींच्या हक्कांपेक्षा उद्योगांचे हित मोठे मानायचे का, हाच आहे.

लोकसंसद

फारुख अब्दुल्ला यांचे देशविघातक वक्तव्य

वेळोवेळी विविध आंतरराष्ट्रीय राजकीय व्यासपीठांवर 'काश्मीर वाद हा एक सक्रिय आणि अनिर्णित आंतरराष्ट्रीय प्रश्न असून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने काश्मिरी जनतेला 'स्वयंनिर्णयाचा अधिकार' मिळवून द्यावा अशी सातत्याने भारतविरोधी भूमिका घेणाऱ्या पाकिस्तानचे नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला आभार मानल्याचे समोर आले आहे. बारामुल्ला येथील सभेत कार्यकर्त्यांसमोर त्यांनी केलेले हे वक्तव्य म्हणजे निव्वळ राजकीय टीका नसून देशाच्या सार्वभौमत्वावर आणि अखंडतेवर सोडलेले विषारी फुत्कार आहेत असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. काश्मीर हा स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग असून ज्या शेजारी पाकिस्तानने आजवर भारताला फक्त दहशतवाद, रक्तपात आणि अशांतता दिली, त्या पाकिस्तानचे कौतुक करणे आणि त्यांचे आभार मानणे अत्यंत संतापजनक आहे. फारुख अब्दुल्लांसारखे नेते भारताचे अंतर्गत प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेऊन देशाची बदनामी करू पाहणाऱ्या शक्तींचे समर्थन कसे काय करू शकतात? भारतातील कोणत्याही राजकीय नेत्याला देशाच्या सुरक्षेशी आणि अखंडतेशी तडजोड करण्याचा अधिकार नाही. राजकीय मतभेद बाजूला ठेवून देशाच्या सुरक्षेच्या आणि अस्मितेच्या मुद्द्यावर सर्व देशवासीयांनी अशा देशविघातक विचारसरणीला वेळीच कडाडून विरोध केला पाहिजे.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा लक्ष्या

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्यसृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटकाप्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या. त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्यासोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपटसृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली, ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या. पु.ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ ऑक्टोबर

१) श्री. हेमंत लक्ष्मण गुळेकर चेंढरे-अलिबाग, २६-१०-१९५६

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

पद्माकर हरिश्चंद्र माळी स्मरणार्थ, अलिबाग



श्री समर्थ चरणपादुका दर्शन सोहळा

रेवदंडा : रेवदंडा येथील श्री मारुती देवस्थान व ब्राह्मण समाज रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांच्या श्री समर्थ चरणपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा शनिवारी (दि.२४) श्री मारुती देवस्थान, रेवदंडा पारनाका येथे पार पडला. श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने रेवदंडा येथे आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. फुलांनी सजविलेल्या मंडपात श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेसह चरणपादुकांची विधिवत पूजा करण्यात आली. उपस्थित भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेतले.

रस्त्याच्या नूतनीकरणात पायाभूत सुविधांची दुरवस्था

● संतप्त सार्तिर्डे ग्रामस्थांकडून रास्ता रोकोचा इशारा

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील साळाव ते तळेखार या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणासह नूतनीकरणाचे काम सुरू असताना, या मार्गावरील गावांच्या अंतर्गत रस्त्यांसह पाणीपुरवठा पाइपलाइन आणि बसथांब्यांची दुरवस्था झाल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. याबाबत संबंधित ठेकेदाराकडे वारंवार पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत सार्तिर्डे येथील ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

साळाव ते तळेखार या मुख्य रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले असल्याचे दिसून येत आहे. वळके ग्रामपंचायत हद्दीतील सार्तिर्डे येथील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे कामही पूर्ण झाले आहे. मात्र, मुख्य रस्त्यावरील पूर्वीचा चढाव कमी करण्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे गावातील बसथांब्याची दुरवस्था झाली आहे. परिणामी, प्रवाशांना बसथांब्यावर जाण्या-येण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असून, बसथांबा असूनही त्याचा योग्य वापर करता येत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.



याशिवाय सार्तिर्डे गावात जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याचीही नूतनीकरणाच्या कामात दुरवस्था झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनचेही कामादरम्यान नुकसान झाल्याने पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. मुख्य रस्त्याचे काम करताना गावातील मूलभूत सुविधांची योग्य काळजी घेण्यात आली नसल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (एमएसआयडीसी) करण्यात येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. सार्तिर्डे येथील अंतर्गत रस्ता, पाणीपुरवठा पाइपलाइन आणि बसथांब्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदाराकडे केली आहे. मात्र, या मागणीला प्रतिसाद मिळत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

साळाव ते तळेखार मार्गावरील सार्तिर्डेसह शिरगाव, मिठेखार आदी गावांमध्येही मुख्य रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाच्या कामामुळे विविध समस्या निर्माण झाल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणेने या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नुकसान झालेल्या सुविधांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

शासकीय योजनांबाबत जनजागृती

मॅजिक बस इंडिया फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

। वावोशी । प्रतिनिधी ।

मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या वतीने सोमवारी (दि.१९) पेण तालुक्यातील हेंमडी आदिवासी वस्ती येथे 'समुदाय विकासासाठी शासकीय योजनांबाबत जनजागृती' या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला वस्तीतील पालक, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस उपस्थित होते.

समुदायातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळावी, योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया समजावी तसेच



नागरिकांच्या समस्या आणि गरजा जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करता यावे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमादरम्यान मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या कम्युनिटी कोऑर्डिनेटर यांनी शासकीय योजनांच्या माहितीपर तक्त्याच्या माध्यमातून पालकांना विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

श्रमदानातून जलसंधारणाचा आदर्श

। माणगाव । प्रतिनिधी ।

आमडोशी नदीवर लोकसहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला आहे. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात महिला व पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले. आमडोशी ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षी नदीवर वनराई बंधारा बांधण्यात येतो. या बंधाऱ्यात अडवलेल्या पाण्याचा उपयोग गावातील नागरिकांना मे महिन्यापर्यंत होत असतो. जनावरांसाठी पाणी उपलब्ध होण्याबरोबरच भाजीपाला लागवडीसाठीही या पाण्याचा मोठा उपयोग होतो. मात्र, यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ऑक्टोबर महिन्यातच नदीतील पाण्याची पातळी घटली. भविष्यातील पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्याचा निर्णय घेतला.

या वनराई बंधाऱ्यामुळे भूजल पातळी सुधारण्यास हातभार लागेल. पावसाचे पाणी अडवून त्याचा योग्य विनियोग करण्यासाठी ग्रामस्थांनी घेतलेला पुढाकार ग्रामीण भागातील जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे.

ओमकार क्रीडा मंडळाची नाट्यभरारी

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील चिरगाव (भेकऱ्याचा कोंड) येथील ओमकार क्रीडा मंडळाने आपल्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील कार्याचा विस्तार करत सांस्कृतिक क्षेत्रातही दमदार पाऊल टाकले आहे. मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पांडुरंगा नको रे बा हा संसार' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग रविवारी (दि.१८) मुंबईतील साहित्य संघ मंदिर, चर्नी रोड येथे उत्साहात पार पडला. या नाटकाच्या पहिल्याच प्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. चिरगावच्या या सांस्कृतिक उपक्रमाने ग्रामीण भागातील कलागुणांना व्यासपीठ मिळवून



देण्याबरोबरच गावाच्या एकजुटीचे दर्शन घडविले.

ग्रामीण भागातील कला, संस्कृती आणि नाट्यपरंपरेला प्रोत्साहन मिळावे, स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि गावाशी जोडलेली सांस्कृतिक नाळ अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने मंडळाने या नाट्यप्रयोगाचे आयोजन केले.

टीबी रुग्णांना फूड बास्केटचे वाटप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत सामाजिक बांधिलकी जपत इंडियन ऑइल अदाणी व्हेंचर्स यांच्या नवघर प्लांटतर्फे उरण तालुक्यातील १२५ क्षयरुग्णांना ७५० फुड बास्केटचे वाटप करण्यात आले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, गव्हाण यांना ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक उपकरणे भेट देण्यात आली. या उपक्रमातून क्षयरुग्णांना पोषण सहाय्य उपलब्ध करून देण्याबरोबरच स्थानिक आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करण्यात आले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केलेल्या आवाहनाला



सकारात्मक प्रतिसाद देत कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला. उरण तालुक्यातील क्षयरुग्णांना सलग चार वर्षे दत्तक घेऊन त्यांना मदत करण्याचा उपक्रम कंपनीकडून राबविण्यात येत आहे. क्षयरुग्णांना नियमित पोषण सहाय्य मिळावे आणि त्यांच्या उपचार प्रक्रियेला मदत व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनिषा चव्हाण यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा पीपीएम समन्वयक सतीश दंतराव आणि उरणचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वंदनकुमार पाटील यांच्या समन्वयातून हा उपक्रम यशस्वी करण्यात आला.

अंजपमध्ये वनराई बंधाऱ्याची निर्मिती

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि जलसंधारणाला चालना देण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत अंजपमधील धाऱ्याचीवाडी येथे वनराई बंधारे उभारण्यात आले. मुख्यमंत्री पंचायतराज अभियान २.० अंतर्गत सेवा संकल्प अभियान राबवून हा उपक्रम पूर्ण करण्यात आला. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे आणि भूजल पातळीत वाढ करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. पाणी योग्य पद्धतीने अडवून त्याचा उपयोग केल्यास ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होऊ शकते.



वनराई बंधाऱ्यांमुळे पाण्याचा प्रवाह नियंत्रित होऊन परिसरातील जमिनीत पाणी मुरण्यास मदत मिळण्याची अपेक्षा आहे. यात अंजप, अंत्राट नीड व धारेवाडी ग्रामस्थांनी सहभाग घेतला. श्रमदान आणि लोकसहभागाच्या माध्यमातून हे बंधारे उभारले जात आहेत.

अंजप ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन जलसंधारणाचे काम केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करत लोकसहभागातून पाणी बचतीचा संदेश देणारा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतो. वनराई बंधारा बांधण्याकरिता भालचंद्र थोरवे यांनी चार ब्रास माती दिली.

तरुणाला मारहाण; दोघांविरोधात गुन्हा

पनवेल : करंजाडे येथे राहणारा उमाकांत पाल हा साई अल्युमिनियम अँड ग्लास वर्क्स या दुकानात स्लाइडिंगचे काम करत होता. यावेळी प्रिन्स पाल आणि जयसिंग पाल (रा.राधाकृष्ण सोसायटी, शिवकर गाव) हे दोघे तेथे आले. आपण घेतलेले स्लाइडिंगचे काम उमाकांतमुळे मिळाले नाही, असे म्हणत त्याला शिवीगाळ आणि दमदाटी करून त्याला मारहाण केली. यावेळी प्रिन्स पालने स्लाइडिंगची काच उमाकांतच्या डोक्यात मारून त्याला जखमी केले. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



गोटीराम भोसले यांचा सन्मान

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील केशव नगर येथील गोटीराम सादुराम भोसले यांना 'समाजगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. सुधागड तालुका मराठा समाजाच्या 'दसरा मेळावा २०२६' निमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सन्मानातून त्यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. भोसले यांनी आपल्या नेतृत्वातून आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून समाजकार्यात योगदान दिले आहे. समाजाप्रती असलेली आपुलकी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून केलेले त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या या योगदानाचा गौरव करत सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

परवाने, शुल्क सवलतींना मुदतवाढ | इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना दिलासा

पाइप गॅस जोडण्यांना गती

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात घरगुती पाइप गॅस जोडण्यांचे काम वेगाने पूर्ण व्हावे, यासाठी राज्य सरकारने गॅस कंपन्यांना दिलेल्या विविध सवलतींची मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवली आहे. यामध्ये परवानग्या २४ तासांत देणे, काही शुल्क माफ करणे आणि २४ तास काम करण्याची परवानगी देणे अशा सवलतींचा समावेश आहे.

राज्यातील स्वंयपाकाच्या गॅसच्या सुलभ वितरणासाठी पाइपद्वारे नैसर्गिक वायू वितरणाला गती मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन नेटवर्कचा जलद आणि वेगवान



विस्तार करण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने ईज ऑफ डुइंग अंतर्गत परवाने देणे सुलभ केले असून काही परवान्यांच्या शुल्क माफीसह अनेक महत्त्वपूर्ण सवलती घोषित केल्या आहेत. गॅस कंपन्याना या सवलती यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत देण्यात आल्या होत्या. आता यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून या सवलती ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार आहेत.

यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने जारी केला आहे.

जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने एलपीजी उपलब्धतेवर मर्यादा येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात पाइपद्वारे नैसर्गिक वायू जोडण्यांचा विस्तार गतीने करण्यासाठी नगर विकास विभागाने सर्व महापालिका व नगरपालिकांसाठी सूचना निर्गमित केल्या आहेत.

महानगरपालिका, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग आणि इतर प्राधिकरणांकडे पाइपलाइनसाठी प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर झालेल्या समजण्यात येणार आहेत. तसेच नव्या परवानग्या केवळ २४ तासांत मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, गॅस पाईपलाईन पुरवठ्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी तसेच विविध परवानग्यांसाठी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या ठिकाणी इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्या स्वतःच्या खर्चातून सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करू शकतील, त्यांना त्यासाठी परवानगी दिली जाणार असून आवश्यक हमीपत्र घेण्यात येणार आहे. तर ज्या ठिकाणी कंपन्यांना स्वतःच्या खर्चाने सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करुन देणे शक्य नसेल त्या ठिकाणी केंद्र शासनामार्फत दिलेल्या अधिसूचनेमधीले विहित शुल्क भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२४ तास काम करण्याची परवानगी

गॅस पुरवठादार कंपन्यांना कामासाठी मोठा दिलासा देताना त्यांना २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्यभरातील विविध विभागांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांना महाराष्ट्रासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यातील नागरिकांना घरगुती नैसर्गिक वायू सुविधा अधिक वेगाने उपलब्ध होण्यास मदत होणार असून, ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधा विस्तारालाही गती मिळणार आहे.

निवडक

सीईआयआर प्रणालीद्वारे मोबाईलचा शोध

माथेरान : माथेरानच्या सामाजिक कार्यकर्त्या सुहासिनी शिंदे यांच्या मोबाईलची दोन महिन्यापूर्वी त्यांच्या सुयोग भोजनालय या



हॉटेलमधून चोरी केली होती. सुहासिनी शिंदे यांनी तात्काळ माथेरान पोलीस स्टेशन येथे रीतसर तक्रार दाखल होती. माथेरान पोलीस स्टेशनने त्यांच्या सायबर सेलच्या माध्यमातून मोबाईल शोधून काढला. याबाबत कॉन्स्टेबल अनिल मोरे यांनी सांगितले की, पोलीस खात्याकडील सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर अर्थात (सीईआयआर) या प्रणालीद्वारे चोरी झालेल्या मोबाईलचा शोध घेतला जातो. आयईएम नंबरद्वारे तसेच मोबाईलमध्ये नवीन सिम कार्ड टाकताच सायबर सेलला लोकेशन प्राप्त होते. हा मोबाईल गोव्याच्या पर्यटकाने चोरला होता. पोलिसांनी तो मोबाईल ज्या व्यक्तीने विकत घेतला त्याच्याकडून घेऊन सुहासिनी शिंदे यांना परत केला.

डॉ. वसंत तळवळकर यांचे निधन

चिरनेर : मुंबईतील प्रसिद्ध बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. वसंत तळवळकर (९०) यांचे शुक्रवारी (दि.२३) वृद्धपकाळाने निधन झाले. एकेकाळी चिरनेर गावाच्या आरोग्य व सामाजिक विकासासाठी झटणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्याने चिरनेर गावावर शोककळा



पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, असा आप्तपरिवार आहे. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर गावात असलेल्या चिरनेर अक्कादेवी जनरल हॉस्पिटल उभारण्यात डॉ. वसंत तळवळकर यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. ग्रामीण आरोग्य सेवेला वाहून घेणाऱ्या डॉ. वसंत तळवळकर यांनी सामाजिक संस्थेची स्थापना करून, वंचित व गरजू मुलांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या बाल आनंद या संस्थेच्या स्थापनेत व कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वैद्यकीय कारकिर्दीत जे.जे. रूग्णालयातील बालरोग शस्त्रक्रिया विभागात ते कार्यरत असताना, त्यांनी लहान मुलांच्या शस्त्रक्रियांमध्ये आणि त्यांच्या आरोग्यासाठी काम करून आरोग्य विभागातील जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या.



मूल्यवर्धन शिक्षण उजळणी प्रशिक्षण

खरोशी : पेण नगरपरिषद शिक्षण विभाग अंतर्गत केंद्राची शिक्षण परिषद शनिवारी (दि.२४) उर्दू शाळा क्र. ५ येथे उत्साहात पार पडली. शिक्षण परिषदेत मूल्यवर्धन शिक्षणाची उजळणी हा प्रशिक्षणाचा मुख्य विषय होता. उपक्रम व प्रात्यक्षिकांमधून शिक्षकांचा वाढता सहभाग यावेळी पहायला मिळाला. शिक्षण परिषदेचे उत्तम आयोजन केंद्राचे केंद्र समन्वयक दशरथ एरणकर यांनी सर्वांच्या सहकार्याने केले. या शिक्षण परिषदेसाठी मुथ्था फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक राहुल मोडके आणि तालुका समन्वयक सागर साळुंके यांच्यासह सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षकांसह ६५ जण उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये मूल्यवर्धनमधील विविध मूल्ये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती, नवीन शैक्षणिक वर्षातील मूल्यवर्धनाची सहा लक्ष मूल्यवर्धन उपक्रमांचे प्रात्यक्षिक तसेच शिक्षण परिषदेमधील शिक्षकांची भूमिका या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षकांनी मूल्यवर्धन उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांमध्ये न्याय, प्रामाणिकपणा, सहकार्य, समानता आणि जबाबदारी यांसारखी जीवनमूल्ये रुजवावीत यावर भर देण्यात आला.



कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी मार्गदर्शन शिबीर

श्रीवर्धन : रा.जि.प. शाळा, रानवली यांच्या वतीने महिला कार्यशाळा रानवली येथे 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अद्भुत जगाची ओळख' या विषयावर शनिवारी (दि.२४) एक दिवसीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेची प्राथमिक ओळख व्हावी, हा यामागचा उद्देश होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक भिकू पांगारकर यांनी प्रास्ताविक करताना एआयची आजच्या काळात असलेली गरज आणि त्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. या शिबिराला रानवली मराठी, जसवली मराठी, भोस्ते शाळा तसेच डॉ. ए. आर. उंद्रे हायस्कूल, रानवली या शाळांतील एकूण ९८ विद्यार्थी आणि ७ शिक्षक उपस्थित होते. शिबिरात मुख्य मार्गदर्शक म्हणून ओरॅकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे प्रॉडक्ट मॅनेजर महेश गुरव आणि जे.एस.डब्ल्यू. स्टील लिमिटेडचे प्रोजेक्ट तंत्रज्ञ विक्रांत धनावडे हे लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना एआयची गरज, त्याची दैनिक व्यवहारातील उपयुक्तता, प्रत्यक्ष कार्यवाही आणि वापर करताना घ्यायची दक्षता व तोटे याबद्दल सोप्या भाषेत सखोल मार्गदर्शन केले. शिबिराच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका विचारल्या, ज्यांचे निरसन मार्गदर्शकांनी अत्यंत कौशल्याने केले.

शुभदा शिंदे यांचे निधन

कोलाड : शुभदा बाळासाहेब शिंदे यांचे मंगळवारी (दि.२०) निधन झाले. त्यांच्या निधनाने शिंदे कुटुंबीय व नातेवाईकांवर शेककळा पसरली आहे. शुभदा शिंदे यांचे



दशक्रिया विधी गुरुवार दि.२९ नोव्हेंबर रोजी, तर उत्तरकार्याचे विधी रविवार, दि.१ नोव्हेंबर रोजी वरसगाव येथे राहत्या घरी होणार आहे. याप्रसंगी जगद्गुरू द्वाराचार्य विद्यावाचस्पती डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, नाशिक यांची कीर्तनसेवा होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून शुभदा शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन शिंदे कुटुंबीयांकडून करण्यात आले आहे.

रायगडातील ७२१ शेतकरी कर्जमुक्त

।।११,१४५ शेतकऱ्यांच्या याद्या आधार प्रमाणीकरणासाठी जाहीर ।। योजनेची चौथी यादी प्रसिद्ध

। रायगड । प्रतिनिधी ।

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील ७२१ शेतकऱ्यांची चौथी यादी २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ११ हजार १४५ लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या आधार प्रमाणीकरणासाठी जाहीर करण्यात आल्या आहेत. पात्र शेतकऱ्यांनी नजीकच्या महा-ई-सेवा केंद्र किंवा कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी केले आहे.



शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज तसेच पुनर्गठित व फेर पुनर्गठन कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. रायगड जिल्ह्यातील बँकांनी योजनेच्या पोर्टलवर एकूण १२ हजार ७४ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. या

■ पात्र शेतकऱ्यांना प्रमाणीकरणाचे आवाहन

माहितीच्या संगणकीय प्रक्रियेनंतर पात्र लाभार्थ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

चौथ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांची नावे संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायती येथे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी यादीतील आपले नाव तपासून ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी पडताळून घ्यावी आणि त्यानंतर आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. आधार प्रमाणीकरण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

या योजनेच्या यादीत एकापेक्षा अधिक बँकांकडून पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश आहे. काही राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांच्या प्रकरणांत कर्ज थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या हेअर कट धोरणानुसार संबंधित कर्ज निरंक करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

योजनेतील पात्र मयत, वयोवृद्ध आणि बोटांच्या ठशांची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळावा, यासाठी मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड तनवीर पाटील यांनी केले आहे.

निवडक



माथेरान पालिकेने स्वीकारली दिव्यांग विद्यार्थ्यांची शिक्षणाची जबाबदारी

नेरळ : माथेरान नगरपरिषदकडून दिव्यांग कल्याण समितीने मोठी घोषणा केली असून शहरातील दोन दिव्यांग विद्यार्थी यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली आहे.दिव्यांग कल्याण विभाग या दोन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च करणार असून पालिकेने शालेय मासिक फी भरण्यापासून या उपक्रमाला सुरुवात केली आहे. माथेरान नगरपरिषदेचा सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पालिकेच्या दिव्यांग कल्याण समितीच्या सभापती रिझवाना शेख यांनी काही महत्वाचे ठराव मांडले. त्यात शहरातील सेंट झेव्हियर कॉन्व्हेन्ट स्कूल मध्ये शिक्षण घेत असलेल्या दोन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पालिकेने आणि दिव्यांग कल्याण समितीने घ्यावी अशी मागणी करणारा ठराव मांडला.या ठरावाला पालिकेचे सर्व सदस्यांनी मान्यता दिली आणि नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी या ठरावाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. त्या विद्यार्थ्यांच्या मासिक फी भरण्यापासून दिव्यांग कल्याण समितीने चांगला निर्णय घेऊन त्याची कार्यवाही सुरू केली आहे.पुढील काळात अशा आणखी विद्यार्थबाबत पालिका सहकार्याची भूमिका घेणार आहे.



कोप्रोली येथे सरीसृप जागृती चर्चासत्र

चिरनेर : फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर यांच्या वतीने राष्ट्रीय सरीसृप जागृती दिनाचे औचित्य साधून, कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांसाठी सर्प ओळख, सर्पदंश आणि त्यावरील उपाययोजना या महत्वपूर्ण विषयावर बुधवारी (दि.२१) चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वंदन पाटील व डॉ. सुनिधी यांच्यासह आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आरोग्य सहाय्यक अशा एकूण २६ कर्मचाऱ्यांसह ७५ आशा वर्कर्स उपस्थित होत्या. यावेळी फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत ठाकूर व राकेश शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शनातून वन्यजीव रक्षण करत असताना सर्पदंश रुग्णांना सर्पदंश कृती दल कशी मदत करत असते याविषयीची वैशिष्ट्यपूर्ण माहिती दिली. ऑक्टोबर-नोव्हेंबर या दरम्यान हंगामी भात शेतीच्या कापणी झोडणीच्या कामांचा वेग मोठ्या प्रमाणावर असतो. यावेळी शेतात सर्पदंश होण्याच्या घटना घडण्याचे प्रमाण सर्वाधिक असते. या पार्श्वभूमीवर शेतात काम करताना घ्यावयाची खबरदारी आणि सर्पदंश झाल्यास तत्काळ कोणत्या शास्त्रीय उपाययोजना कराव्यात, याविषयीचे मार्गदर्शन करण्यात आले.

स्वच्छतागृहाच्या दुरुस्तीची मागणी

नेरळ : नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाजूला असलेल्या राजमाता जिजामाता तलाव परिसरात स्वच्छतागृह आहे. हे स्वच्छतागृह नादुरुस्त अवस्थेत आहे. त्या स्वच्छतागृहाचा दरवाजा देखील सुस्थितीत नाही आणि त्यामुळे स्थानिकांची वर्दळ लक्षात घेता तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी सम्राटनगर येथील स्थानिक रहिवाशी यांनी नेरळ ग्रामपंचायतीकडे केली आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची मॉर्निंग वॉकसाठी या तलाव परिसरात गर्दी असते. त्यांना अनेकदा स्वच्छतागृहाची गरज आणि त्यासाठी बांधण्यात आलेले स्वच्छतागृह हे नादुरुस्त अवस्थेत आहे. ते स्वच्छतागृह तात्काळ दुरुस्त करण्यात यावे, अशी मागणी सम्राटनगर येथील कार्यकर्ते रवींद्र लवंगे यांनी केली आहे.





शिवसेनेच्या वतीने सरकारला निवेदन

चिरनेर : उरण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा, स्मार्ट मीटर व वाढीव बिलांविरोधात उरण शिवसेनेच्या वतीने तहसीलदार व महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांची भेट घेऊन उरण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी उपजिल्हा प्रमुख नरेश रहाळकर, तालुका प्रमुख संतोष ठाकूर, माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, गणेश शिंदे,शहरप्रमुख विनोद म्हात्रे आदी उपस्थित होते.



सावळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला प्रारंभ

। नेरळ । प्रतिनिधी ।

मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यापासून सावळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम आता सुरू झाले आहे. स्थानिक ग्रामस्थ यांच्याकडून सावळे गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात होता.

कर्जत तालुक्यातील सावळे हेदवली गावाला जोडणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली होती.शहापूर मुरबाड कर्जत या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वरील सावळे फाटा ते हेदवली असणारा रस्ता हा मागील चार वर्षापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातुन शासनाकडून करण्यात आला होता. परंतु हा रस्ता दोन वर्षांपर्यंत टिकला व आज रोजी सदर रस्त्यावर मोठमोठाले खड्डे पडले आहेत. रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर कुठेही डांबर शिल्लक राहिली नाही.त्यामुळे गेल्या आ वर्षापासून मुरबाड रस्त्यावरून सावळे आणि हेडवली गावाकडे स्थानिकांना चार ते पाच किलोमीटरचा प्रवास पायपीट करावा लागत आहे.त्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी सातत्याने त्या खराब त्याबद्दल आवाज उठवला होता. कर्जत तालुकाप्रमुख बाजीराव दळवी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे फेब्रुवारी २०२६ रोजी पत्र देऊन रस्ता नव्याने करण्याची मागणी केली आहे.

अखेर स्थानिकांच्या मागणीला यश आले असून सावळे फाटा ते सावळे तसेच सावळे गावाचे प्रवेशद्वार ते भीमाशंकर रोडला जोडणारा रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे.सदर रस्त्याची प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन हा रस्त्या सिमेंटचा बनविण्यात यावा अशी मागणी होत आहे.अन्यथा या रस्त्यासाठी सावळे हेदवली ग्रामस्थांकडून आणि कर्जत तालुका तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचा आंदोलन प्रशासनाच्या विरुद्ध छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.मात्र याच रस्त्यावर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्याचे काम मंजूर होते.या योजनेतून मंजूर असलेले कोणते काम पूर्ण झाले, किती काम पूर्ण झाले याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

सभासदांची दिवाळी होणार गोड

माणगाव : रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,उतेखोल या नामांकित पतसंस्थेच्या सभासदांची यावर्षीही दिवाळी गोड होणार आहे. दरवर्षी या पतसंस्थेचा वर्धापन दिन, विद्यार्थी गुणगौरव सोहळा मान्यवर,सभासद,ठेवीदार,खातेदार व संस्थेचे संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शिवाय हि पतसंस्था संकटग्रस्त व पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीकरिता अग्रेसर असते. या संस्थेने आपल्या प्रगतीचे आणखी एक यशस्वी पाऊल टाकताना इंदापूर शाखा सुरु केली आहे.

धाक्सुद महाराज पालखी सोहळा उत्साहात

। कोलाड । प्रतिनिधी ।

येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान आराध्य ग्रामदैवत धाक्सुद महाराज यांचा नवरात्रोत्सव हा रोहाचे आराध्यदैवत श्री धावीर महाराज यांच्या प्रमाणेच साजरा केला जातो. नवरात्रीचे नव दिवस येथील ग्रामस्थ व धाक्सुद क्रीडा मंडळाचे युवक विविध कार्यक्रम व उपक्रम करत दसरा उत्सव साजरा करतात तर अकराव्या दिवशी श्री धावीर महाराज यांच्या पालखी सोहळ्याबरोबरच येथील या देवाचा पालखी सोहळा येथील ग्रामस्थ महिला युवक व युवती एकत्रितपणे साजरा करतात .



टाळ मृदुंग हरिनामाचा गजर पालखीवर फुलांची उधळण करत तसेच फटाक्यांची आतषबाजी, फुगडी, नाच गाणे, धार्मिक तथा आध्यत्मिक सतं महातम्यांच्या अभंगाने नामघोष करत हा सोहळा साजरा करण्यात आला.

या उत्सवानिमित्त मंदिर व संपूर्ण गाव परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने तसेच रोषणाईने सडा रांगोळ्यांनी सजविण्यात आले होते. प्रत्येकाने आपल्या अंगणात प्रमुख देवांची पालखी येणार असल्याने सुंदर रांगोळ्या रेखाटल्या होत्या. दुपारी तीन वाजता मंगलमय वातावरणात तसेच गोंधळ्यांच्या पारंपरिक वाद्याने ग्रामदैवताची महाआरती करत धाक्सुद महाराजांचा जयघोष करत पालखी मंदिरातून गावात मार्गस्थ झाली.

'रोडमॅप अभ्यासक्रमाचा' पुस्तकाचे प्रकाशन

। पनवेल । प्रतिनिधी ।

■ बाळाराम पाटील यांची उपस्थिती; विद्यार्थ्यांना पुस्तक विनामूल्य

दहावी आणि बारावीच्या परीक्षेनंतर पुढील शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची निवड करताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या रोडमॅप अभ्यासक्रमाचा या पुस्तकाचे प्रकाशन आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विचुंबे येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात तरुणाईच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हा सोहळा पार पडला.

आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन आणि शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम भोईर यांच्या पुढाकारातून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकार मंदार दोंदे यांनी पुस्तकातील मजकुराचे संकलन केले असून, नवी मुंबईतील प्रिंट ऑन सोल्युशन्सचे संचालक प्रशांत चातुर्य यांनी पुस्तकाची छपाई केली आहे. विचुंबे येथील शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत साई संदेश वेल्फेअर असोसिएशनच्या नवरात्रोत्सवात या पुस्तकाचे प्रकाशन झाले.



यावेळी बोलताना आम दार बाळाराम पाटील यांनी पुस्तकनिर्मितीच्या उपक्रमाचे कौतुक केले. हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी उपयुक्त ठरणार असून, विविध अभ्यासक्रमांच्या माहितीसोबतच पुरोगामी विचार देणाऱ्या महापुरुषांचा परिचयही यातून विद्यार्थ्यांना होईल, असे त्यांनी सांगितले. सध्या ५०० पुस्तके उपलब्ध करण्यात आली असून, गरज भासल्यास आणखी प्रती प्रकाशित कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. अमराठी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी आवृत्ती तयार करण्याची सूचनाही त्यांनी मांडली.

पुरुषोत्तम भोईर यांनी सांगितले की, गावाचा विकास केवळ रस्ते आणि पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता आणि शैक्षणिक प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार शिक्षणक्षेत्र निवडून करिअर घडवावे, या उद्देशाने पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल, विचुंबे येथे ओळखपत्र दाखवून पुस्तकाची प्रत विनामूल्य मिळणार आहे.

२ नोव्हेंबरपासून शाळांना दिवाळीची सुट्टी

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील मान्यताप्राप्त खासगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या दिवाळी सुट्टीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. २ नोव्हेंबरपासून विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी मिळणार असून, १६ नोव्हेंबर रोजी शाळा पुन्हा सुरू होतील. माध्यमिक शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्षामधील सत्र आणि सुट्ट्यांबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

दिवाळीच्या सुट्टीचे नियोजन करताना विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना या वेळापत्रकाची मदत होणार आहे. यंदा दिवाळीची सुट्टी २ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत राहणार आहे. त्यानंतर १५ नोव्हेंबरला रविवार असल्याने सोमवार, १६ नोव्हेंबरपासून शाळांचे नियमित कामकाज सुरू होईल.

शाळांनी शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या सुट्ट्यांच्या वेळापत्रकात स्वतःहून बदल करू नयेत, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

शाळांच्या सुट्ट्यांबाबत शिक्षण विभागाचे निर्देश

माध्यमिक शाळा संहितेनुसार, संपूर्ण शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या सुट्ट्यांची एकूण संख्या ७६ दिवसांपेक्षा अधिक नसावी. तसेच शाळांचे वर्षभरातील कामाचे दिवस किमान २३० असणे आवश्यक आहे. या नियमांचे पालन करण्याच्या सूचना शिक्षण विभागाने शाळांना दिल्या आहेत. गणेशोत्सव, नाताळ किंवा अन्य सणांसाठी स्थानिक सुट्ट्या द्यायच्या असल्यास दिवाळी किंवा उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत समायोजन करण्यापूर्वी शिक्षणाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल.

शाळांचे पहिले आणि दुसरे सत्र

माध्यमिक शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र १५ जून २०२६ पासून सुरू झाले असून, ते ३१ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर १६ नोव्हेंबरपासून दुसऱ्या सत्राला सुरुवात होईल. हे सत्र १ मे २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे.दुसरे सत्र संपल्यानंतर ३ मे ते १४ जून २०२७ या कालावधीत उन्हाळी सुट्टी असेल.

रेवदंडा येथे अमृत पेठ थेट स्वदेशी बाजारपेठ

रायगड : महिला सक्षमीकरण, स्थानिक लघुउद्योगांना चालना आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या अमृत या स्वायत्त संस्थेच्या वतीने चंपावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने रेवदंडा, ता. अलिबाग येथे अमृत पेठ थेट स्वदेशी बाजारपेठ आयोजित करण्यात आली आहे. ३० ऑक्टोबर ते रविवार, १ नोव्हेंबर २०२६ या तीन दिवसांत भरणाऱ्या या बाजारपेठेत स्थानिक उद्योजकांचे ४० हून अधिक स्टॉल्स असणार आहेत. दिवाळीच्या खरेदीसोबतच स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्याची संधी नागरिकांना या उपक्रमातून मिळणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सत्काराचे कार्यक्रम टाळा

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

■ पालकमंत्री भरत गोगावले यांचे आवाहन

संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे सावट लक्षात घेता, सध्याच्या काळात जाहीर सत्काराचे कार्यक्रम टाळून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्या, असे आवाहन रायगडचे पालकमंत्री तथा राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी कार्यकर्त्यांना केले. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नागरिकांनी आतापासूनच पाणी बचतीचे नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्राथमिक शाळा, मोरगिरी येथील ३० लाख रुपये खर्चाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री गोगावले यांच्याहस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात मोरगिरी ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात येऊन मोरगिरी गावठाण प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मंत्री गोगावले यांनी पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत पाणी मुरवणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी नागरिकांनी आतापासूनच दक्ष राहावे, असेही स्पष्ट केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **प्लंबिंग व पाईपलाईन कामासाठी हेल्पर पाहिजेत.** संपर्क : हजारे एंटरप्रायजेस मारूती नाका, अलिबाग- रायगड ९८२२००१८५३
- **जागा भाड्याने हवी आहे.** मुख्य गोंधळपाडा, अलिबाग येथे सुमारे २०० चौ. फूट गाळा, सलग्न बाथरूमसह भाड्याने हवा आहे. संपर्क : ७७९८८३३७७७
- **S.T. स्टँड जवळ, अजंठा लाँच ऑफिसच्या वर, पहिल्या मजल्यावरील** 1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
संपर्क : ९५५२१८३७६१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

महिलांच्या कलागुणांना मिळणार व्यासपीठ | **सामाजिक एकोपा जपण्याचा स्तुत्य प्रयत्न**

आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी पुढाकार

। माणगाव । प्रतिनिधी ।

समाजाचा खरा विकास केवळ रस्ते, इमारती आणि भौतिक सुविधांपुरता मर्यादित नसतो, तर समाजातील शेवटच्या घटकाच्या जीवनात सुरक्षितता, सन्मान आणि संधी निर्माण करण्यातून तो साध्य होत असतो. याच सामाजिक जाणिवेतून भादाव गावात आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवण्यापासून ते महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यापर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून सिद्धेश संतोष जुमारे यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.



दाखले आणि ९ शिधापत्रिकांचे वाटप!

आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध होणे, ही त्यांच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची गरज आहे. याच दृष्टीने भादाव येथील आदिवासी वाडीवर आदिवासी नागरिकांना मोफत जातीचे दाखले आणि शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमांतर्गत एकूण २३ जातीचे दाखले आणि ९ शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी जगन मुकणे आणि रवींद्र बावदाने उपस्थित होते.

सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामादरम्यान आदिवासी वाडीतील नागरिकांना रस्ता सुरक्षितपणे ओलांडता यावा, यासाठी सर्कल उभारण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आल्याचे स्थानिक नागरिकांनी नमूद केले होते. मात्र, ही सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध न झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.आदिवासी बांधवांना दैनंदिन कामांसाठी महामार्ग ओलांडताना संभाव्य धोक्याचा सामना करावा लागू नये, या उद्देशाने सिद्धेश जुमारे यांनी माध्यमांशी संवाद साधत हा प्रश्न प्रशासनासमोर मांडला. संबंधित ठिकाणाची पाहणी करून नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता यावा, यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. विकासाच्या प्रवासात आदिवासी नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होऊ नये, हा या मागणीमागील महत्त्वाचा मुद्दा आहे.

परंपरेला नव्या पिढीशी जोडण्याचा प्रयत्न!

महिलांचे कौशल्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास यांना योग्य व्यासपीठ मिळावे, या भावनेतून नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने भादाव गावात महिला पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या पाक कौशल्याला प्रोत्साहन देणे, पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन करणे आणि महिलांना आनंददायी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

सिद्धी नगर पसिसरात पथदिवे बंद

• नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर, प्रकाशासाठी मोबाईलच्या बॅटरीचा वापर

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव नगरपंचायतीच्या खांदाड आणि लगतच्या सिद्धी नगर परिसरात गेल्या पाच-सहा महिन्यांपासून पथदिवे बंद असल्याने नागरिकांना दररोज अंधारातून वाट काढावी लागत आहे. सायंकाळ होताच रस्त्यांवर पसरलेल्या काळोखामुळे महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील वर्दळीच्या भागातच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.



ऑक्टोबर महिन्यात दिवस लहान आणि रात्री मोठ्या होऊ लागल्याने सायंकाळी लवकरच अंधार पडू लागतो. अशा वेळी रस्त्यांवर पुरेसा प्रकाश असणे अत्यावश्यक आहे. काही नागरिक मोबाईलच्या बॅटरीचा वापर करतात. दरम्यान, बंद पथदिवे येत्या दोन-तीन दिवसांत दुरुस्त करून सुरू करण्यात येतील, असे आश्वासन मुख्याधिकारी संतोष माळी यांनी शुक्रवारी (दि.१६) ऑक्टोबर रोजी दिले आहे.

अंधारमय रस्त्यांवरून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करण्याची वेळ येऊ नये. तसेच रुग्णांना रुग्णालयापर्यंत सुरक्षितपणे पोहोचता यावे आणि प्रत्येक नागरिकाचा रात्रीचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी नगरपंचायतीने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

तलाव परिसरातील मगरींचा वावर

बाळा डीजे यांच्या घरासमोर तसेच वालेराव यांच्या निवासस्थानामागे मोठे जलसाठे आहेत. ऑक्टोबरमधील उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी होत असल्याचे सांगितले जाते. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या तलावांच्या परिसरात मध्यम आकाराच्या मगरींचा वावर जाणवत असून, रात्रीच्या सुमारास पाण्यात हालचालींचे आवाजही ऐकू येतात.

मद्यपीचा पोलिसांवर हल्ला

पनवेल : सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर बसून मद्यपान करण्यास मज्जाव केल्याचा राग आल्याने एका मद्यपीने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांशी हुज्जत घालत त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस अंमलदार जखमी झाला. खारघर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. डीन रमेश असे आरोपीचे नाव आहे. पाटील आणि चौरे हे खारघर परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी डीन रमेश रस्त्यावर मद्यपान करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्याला मद्यपान करण्यास मज्जाव केला असता, त्याने पोलिसांशी वाद घालत त्याच्यावर हल्ला केला.

उपक्रमांतून नवरात्रौत्सवाचा जल्लोष

चरीच्या हनुमान मंदिराच्या प्रांगणात रंगला सोहळा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जुन्या नव्या गाण्यांचा साज, पारंपारिक संस्कृतीचे जतन, सुप्त कलागुणांना वाव, समाज प्रबोधन अशा वेगवेगळ्या उपक्रमांतून चरी येथे नवरात्रौत्सवाचा जल्लोष करण्यात आला. हनुमान मंदिराच्या प्रांगणात हा सोहळा रंगला. ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुणाई सर्वच घटकातील मंडळींनी एकत्र येऊन उत्सव साजरा केला.

चरी येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात सुशोभीत अशा भव्य मंडपात दुर्गा देवीच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली. नऊ दिवस वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे करण्यात



आले. ज्येष्ठ महिलांसाठी ग्रामीण संस्कृतीमधील जून्या पारंपारिक गाण्यांच्या स्पर्धा तसेच भोवर नृत्य गायन स्पर्धा आयोजित केल्या. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी नवरात्रौत्सव मंडळाचे अध्यक्ष मंगेश पाटील, महेंद्र म्हात्रे, सुनील थळे, महेश नाईक, नामदेव पाटील, महादेव म्हात्रे, विकास जाधव, रविंद्र पाटील आदींनी परिश्रम घेतले.

'खड्डे बुजवा अन्यथा रास्ता रोको'

। पनवेल । प्रतिनिधी ।



: पनवेल माथेरान रोड, नेरे-धोदाणी मालडुंगे रस्ता तसेच चिपळे ते मोरबे आणि वाकडी ते दुंदरे रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्त्याच्याकडेला वाढलेले गवत तात्काळ काढण्याची मागणी विश्वास पाटील, दिनेश मांडवकर, विद्याधर चोरघे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडलेले असून याचा त्रास वाहन चालकांना होत आहे. दुचाकी चालवताना तर तारेवरची कसरत करावी लागते. नेरे ते वाकडी-दुंदरे रोडपर्यंत गवत आणि झुडपे वाढलेले आहेत. त्यामुळे समोरून येणारी गाडी दिसत नाही. त्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात होतात. सात दिवसात रस्त्यावरील खड्डे बुजवून आजूबाजूचे गवत कापले नाही तर शिवसेनेच्या वतीने रास्ता रोको करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

सेझ रद्द, तरी जमिनींचा तिढा कायम

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यात सेझ प्रकल्पासाठी जमिनी विकलेल्या शेतकऱ्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जवळपास दोन दशके उलटूनही जमिनींवर प्रकल्प उभा राहिला नाही, त्यातच शासनाने सेझ रद्द केल्याने आता सातबाऱ्यावर पुन्हा आपले नाव लागावे, यासाठी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

सन २००६-०७ च्या सुमारास पेण तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी सेझ प्रकल्पासाठी आपल्या जमिनी विकल्या होत्या. मात्र, इतकी वर्षे उलटूनही संबंधित जमिनींवर कोणताही



पीकपाणी नोंदीसाठी शेतकरी आक्रमक

प्रकल्प उभारण्यात आला नाही. त्यामुळे गेल्या दोन ते तीन वर्षांपासून शेतकरी आपल्या जमिनीवरील हक्कासाठी पाठपुरावा करीत आहेत.

याच पार्श्वभूमीवर रावे येथील शेकडो शेतकऱ्यांनी शनिवारी (दि.२३) ऑक्टोबरला पेण येथील मंडळ अधिकारी कार्यालय गाठत पिकपाणी सदरी शेतकऱ्यांची नावे नोंदविण्याची मागणी केली. यासाठी शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या अर्ज दाखल केले आहेत.

जमिनी विकल्या, प्रकल्पही नाही आणि नोंदीचा प्रश्नही कायम आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना न्याय कधी मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या अर्जांवर महसूल प्रशासन काय निर्णय घेते, तसेच सातबारा उताऱ्यावरील नोंदीबाबत कोणती कार्यवाही होते, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, यावेळी काही शेतकऱ्यांनी 'कृषीवल'शी संवाद साधत आपली भूमिका मांडली.

पंचशील नगरमध्ये पायवाटेवर अतिक्रमण

पनवेल : नवीन पनवेल पंचशील नगर झोपडपट्टीमधून दररोज हजारो प्रवासी रेल्वे स्थानकाकडे ये-जा करण्यासाठी धावपळ करत असतात. त्यांच्या पायवाटेमधील रस्ता आधीच अरुंद आहे. या पायवाट रस्त्यावर दिवसेंदिवस झोपडपट्टीमधील रहिवाशांनी अनेक छोटी-छोटी दुकाने सुरू करण्यासाठी जागा अडविल्या असल्याने रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत आहे. या समस्येवर प्रशासनाने उपाय योजना करवी अशी मागणी केली जात आहे.

जीर्ण वीजखांब घरावर कोसळला

अलिबाग : मौजे चिंचोटी येथे महावितरणचा जीर्ण झालेला विजेचा खांब शनिवारी (दि.२४) ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे ५.१५ वाजता प्रभाकर धर्मा भांजी यांच्या कौलारू घरावर कोसळला. या दुर्घटनेत घराचे व छतावरील कौलांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नसल्याने मोठी जीवितहानी टळली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ व पंचमंडळी घटनास्थळी जमा झाले. त्यानंतर उसर येथील कनिष्ठ अभियंता निखिलेश शेंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चिंचोटी विभागाच्या तलाठी दीक्षा कडू आणि चिंचोटी



गट ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनीही घटनास्थळी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा केला. या घटनेनंतर ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत गावातील इतर जीर्ण व धोकादायक विजेचे खांब तातडीने बदलण्याची मागणी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त कुटुंबाला भरपाई लवकरात लवकर मिळावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. आणखी एखादा खांब कोसळून दुर्घटना घडण्याची वाट महावितरण पाहणार का? असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी संभाव्य धोका लक्षात घेऊन परिसरातील धोकादायक खांब त्वरित बदलण्याची मागणी केली आहे.

जाहीर निविदा सुचना

श्री कनकेश्वर देवस्थानचे मालकीचे मौजे सोगाव येथील गट क्रमांक २३१ मधील क्षेत्र गौण खनिज उत्खननाकरीता परवाना तत्वावर देणेसाठी

श्री कनकेश्वर देवस्थानचे मालकीच्या मौजे सोगाव, ता. अलिबाग, गट क्रमांक २३१ मधील विद्यमान क्वारीज आणि त्यालगतचे १२० मिटर लांब आणि ३५ मिटर रूंब मोजमापाचे एकूण पाच भूखंड तीन वर्षाचे मुदतीकरीता गौण खनिज (दगड, मुरूम) उत्खननाकरीता परवाना तत्वावर परवाना शुल्क आकारून देणेचा निर्णय विश्वस्त मंडळाने घेतलेला आहे. त्याबाबतच्या प्रमुख अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१ अर्जदार व्यक्ती/संस्था अलिबाग तालुक्यामध्ये वास्तव्य-व्यवसाय करणारी असावी. त्याबाबत कागदोपत्री पुरावा अर्जासोबत सादर करणेचा आहे.

२.अर्जदार व्यक्ती/संस्थेचे मालकीची गौण खनिज उत्खनन, वाहतुक यासाठी आवश्यक असणारी यंत्र सामग्री, वाहने असणे आवश्यक आहे. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा (मोटार वाहन विभागाकडे वाहन नोंदणी प्रमाणपत्र, परवाना इ.) अर्जासोबत सादर करणेचा आहे.

३.अर्जदार व्यक्ती/संस्थेने गौण खनिज उत्खननाकरीता ग्रुप ग्रामपंचायत मापगाव, ता.अलिबाग यांचेकडून ना-हरकत दाखला प्राप्त करून अर्जासोबत सादर करणेचा आहे.

४.अर्जदार व्यक्ती संस्थेने निविदा सादर करणेपुर्वी सोगाव गट क्र. २३१ मधील विद्यमान क्वारी क्षेत्र आणि त्यालगतचे क्षेत्रामध्ये जाऊन त्यामधील गौण खनिज उपलब्धतेबद्दल स्वत:ची खातरजमा करून घेणेची आहे.

५.अर्जदार व्यक्ती/संस्थेने देवस्थानाला प्रति भूखंड प्रति महा घेऊ केलेल्या परवाना शुल्क रकमेचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा. परवाना शुल्क रकमेवर प्रचलित नियमाप्रमाणे जी.एस.टी. स्वतंत्रपणे आकारून वसुल केला जाईल.

६.ज्या अर्जदारांचे अर्ज मंजूर होतील त्यांनी स्वत:चे जबाबदारीवर सोगाव गट क्र. २३१ मध्ये क्वारी व्यवसाय करणेसाठी राज्य/केंद्र शासनाचे नियमांनुसार आवश्यक त्या पर्यावरण विषयक परवानग्या, ना-हरकत दाखले, स्फोटके कायद्यांतर्गत परवाने, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील परवानग्या, त्यांचा अर्ज मंजुरी पत्राचे दिनांकापासून तीस दिवसांचे आत प्राप्त करणेच्या आहेत. या सर्व परवानग्या, परवाने, ना-हरकत दाखले यांच्या प्रमाणित सत्यप्रती सादर केल्यानंतर करार करून क्वारी व्यवसायाकरीता भूखंड ताब्यात देण्यात येईल.

७.ज्या अर्जदारांचे अर्ज मंजूर होतील त्यांना देवस्थान निश्चीत करेल त्या परवाना शुल्क रक्कम अधिक त्यावर देय असलेल्या जी.एस.टी.ची संपुर्ण परवाना कालावधीमध्ये देय होणाऱ्या रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी करार करतेवेळी सादर करावी लागेल.

८.एका पात्र अर्जदाराला केवळ एकच भूखंड देण्यात येईल.

९.ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना देवस्थानबरोबर लेखी करार करून द्यावा लागेल. त्या करारातील अटी व शर्ती देवस्थान निश्चित करेल. शासनाकडे स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) परस्पर जमा करून त्याच्या पावत्यांच्या सत्यप्रती देवस्थानकडे सादर करणेच्या आहेत.

१०. ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांनी सोगाव गट क्र. २३१ मध्ये देवस्थान नमूद करेल त्याठिकाणी स्थानिक प्रजातीची २००० झाडांची लागवड शासनाच्या वनविभागाचे मार्गदर्शनामध्ये करून त्याची तीन वर्षे देखभाल, निगा, जलसिंचन स्वखर्चाने करावे लागेल.

११. अर्जदारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लखोट्यामध्ये ही निविदा सूचना प्रसिद्ध झालेपासून दहा दिवसांचे मुदतीत देवस्थानचे चोरोंढे, पो. मापगाव, ता. अलिबाग येथील कार्यालयामध्ये रजिस्टर्ड स्पीड पोष्ट ए.डी. द्वारे अथवा हाती सकाळी १०.०० वाजल्यापासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या वेळेमध्ये आणून देणेच्या आहेत.

१२. अर्जासोबत अर्ज छाननी शुल्क (विना परतावा) म्हणून रू.५,०००/-(रुपये पाच हजार मात्र) कनकेश्वर देवस्थानच्या नावे काढलेल्या चोंढी, ता. अलिबाग येथे देय होणारा डिमांड ड्राफ्ट जोडावा.

१३. आलेल्या सर्व निविदा, कोणतीही कारणे न देता नाकारणेचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवला आहे.

अलिबाग — **विश्वस्त मंडळातर्फे अध्यक्ष**
दिनांक :- २५/१०/२०२६ — **श्री कनकेश्वर देवस्थान**

करंजाडेत स्पोर्ट्स बाईकची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील करंजाडे परिसरात पार्क करून ठेवलेली सुमारे चार लाख रुपये किमतीची बीएमडब्ल्यू कंपनीची स्पोर्ट्स मोटारसायकल दोन अनोळखी तरुणांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल नाईक (रा.करंजाडे) यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारदारांनी पार्क करून ठेवलेली बीएमडब्ल्यू जी ३१० आरआर मॉडेलची स्पोर्ट्स मोटारसायकल दोन अनोळखी व्यक्तींनी संगनमताने आणि त्यांच्या संमतीशिवाय चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. चोरीला गेलेल्या मोटारसायकलचा रंग पांढरा असून, तिचा नोंदणी क्रमांक एमएच-४६-सीएल-६००९ आहे. या मोटारसायकलची अंदाजे किंमत चार लाख रुपये आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत पुढील तपास करीत आहेत. चोरीला गेलेल्या मोटारसायकलचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

गावठी दारूची विक्री करणाऱ्यांवर पोलिसांचा छापा



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहर पोलिसांनी तक्का गावातील कातकरी वाडी परिसरात गावठी दारू विक्रीविरोधात कारवाई करत पार्वती पवार या महिलेकडून ६० लिटर गावठी दारूसह एकूण ८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला तक्का गावातील कातकरी वाडी परिसरात गावठी दारू विक्री सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्या नेतृत्वाखाली संदेश सदाशिव म्हात्रे, अविनाश गंथडे, मिथुन भोसले, सोमनाथ म्हात्रे, शशिकांत काकडे, सुशीला सवार, तेजस्विनी भगत यांनी पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पवार झोपडीत हिच्याकडे चार प्लास्टिकचे कॅन आढळले. तपासणी केली असता प्रत्येक कॅनमध्ये १५ लिटर याप्रमाणे एकूण ६० लिटर गावठी दारू मिळून आली. पोलिसांनी गावठी दारूसह प्लास्टिकच्या पिशव्या, काळ्या रंगाची प्लास्टिकची बादली, स्टीलचा डबा, तीन स्टीलचे ग्लास, प्लास्टिकची गाळणी आणि बाटली असा एकूण ८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे निंबारवाडी, तालूका -पेण, जिल्हा - रायगड येथील खालील व्यक्तींचे सातबारा सदरी नावे असलेल्या, ताबेकब्जातील तसेच सामाईक मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या जमिन मिळकती माझे आशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे निंबारवाडी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड

मालकांची नावे/ कब्जेदारांची नावे	भुमापन/ उपविभाग नं.	भोगवटादार वर्ग	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रू.पैसे
१)श्री.लखी सोमा निरगुडा २)श्रीमती.राई महादु रायगुडा ३)श्री.वामन बामा वीर ४)श्रीमती.महादी हरी वाघ ५)श्रीमती कमली पांडु वाघ ६)श्रीमती.जानकी मंगळ्या शिद	९	वर्ग-२	१-१६-०० पो.ख.०-००-०० एकुण क्षेत्र १-१६-००	१.९४
१) श्री.हाशा महादु वाघ	१०	वर्ग -२	०-९२-०० पो.ख.०-००-०० एकुण क्षेत्र ०-९२-००	१.३१

तरी वर नमूद जमीनीवर/मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर पुराव्यासह समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर वर नमूद मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे आशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण-पनवेल — सही/-
दिनांक - २३/१०/२०२६ — **अॅड. वंदन धर्मा घरत.**
(बी.ए.एलएल.बी)
शॉप नं.३, प्लॉट नं.१४, नवीन वरचे ओवळे, सेक्टर १, एम.पी.ए.एस.सी. कॉलेज जवळ, करंजाडे, तालुका पनवेल,जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल नं ८९७६६५९८३७

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २४.०८.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक २३.०९.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सुनील शिवराम उगले मयत वारस तर्फे श्रीमती सरिता सुनील उगले यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये ३४,३८,४१३/- व दिनांक ०१.०९.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव शिळ, खालापूर तालुका हद्दीतील सर्व्हे क्र. २३/१, सिटी सर्व्हे क्र.२१९६ व सर्व्हे क्र. २३/२, सिटी सर्व्हे क्र. २१४४ तालुका खालापुर, जिल्हा रायगड येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०८.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये ३४,३८,४१३/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

कर्जदार :- श्री. सुनील शिवराम उगले मयत वारस तर्फे श्रीमती. सरिता सुनील उगले मौजे शिळ, खालापूर तालुका हद्दीतील सर्व्हे क्र. २३/१, सिटी सर्व्हे क्र. २१९६ व सर्व्हे क्र. २३/२, सिटी सर्व्हे क्र.२१४४, सदनिका क्रमांक ५११, ५ वा मजला, ए विंग, डेक्कन रेसिडेन्सी इमारत, क्षेत्रफळ ४६२ चौ. फुट

स्थळ : खालापूर — सही/-
दिनांक : २३.१०.२०२६ — **श्री. आर. जी. पालकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २४.०८.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १९.०९.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. देवेन अरुण यादव यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये ६३,१४,८६८/- व दिनांक ०१.०९.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव पोसरी, कर्जत तालुका हद्दीतील गट नं. २८/ब/१, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०८.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये ६३,१४,८६८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

कर्जदार :- श्री. देवेन अरुण यादव
मौजे पोसरी, कर्जत तालुका हद्दीतील गट नं. २८/ब/१, तालुका कर्जत, जिल्हा रायगड क्षेत्रफळ ५-७५-०० हे. आर

स्थळ : खालापूर — सही/-
दिनांक : २३.१०.२०२६ — **श्री.आर.जी पालकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक

भारत आणि पाकिस्तान नोव्हेंबरमध्ये दोनदा आमने-सामने

मुंबई : भारत-पाकिस्तान क्रिकेट चाहत्यांसाठी नोव्हेंबर महिन्यात मोठी मेजवानी आहे. हे दोन कट्टर प्रतिस्पर्धी एकदा नव्हे, तर दोनदा एकमेकांना क्रिकेटच्या मैदानावर भिडणार आहेत. एकीकडे १९ वर्षांखालील आशिया कप ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे, तर दुसरीकडे आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६ चे वेळापत्रक नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. या दोन्ही स्पर्धांमध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात लढत रंगणार आहे. आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धा १९ नोव्हेंबरपासून कतारमधील दोहा येथे सुरू होईल आणि अंतिम सामना २९ नोव्हेंबर रोजी खेळला जाईल. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान आपले मअफ संघ मैदानात उतरवतील, तर नेपाळ, संयुक्त अरब अमिराती आणि हाँगकाँग चीन आपले प्रमुख संघ घेऊन स्पर्धेत उतरण्याची शक्यता आहे. भारत अ आणि पाकिस्तान अ या संघांचा नेपाळ आणि यूएईसह ब गटात समावेश करण्यात आला आहे. भारत अ संघाचा पहिला सामना २० नोव्हेंबरला नेपाळविरुद्ध होईल, तर २२ नोव्हेंबरला पाकिस्तान अ संघासोबत दोन हात करण्यासाठी भारत अ मैदानावर उतरेल. साखळी फेरीतील शेवटचा सामना २४ नोव्हेंबरला यूएईविरुद्ध खेळावा लागणार आहे. दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरल्यास त्यांच्यात अंतिम सामना होण्याची शक्यता आहे.



क्रिकेटपटू मेहदी हसन हृदोयचे निधन

ढाका : बांगलादेशचा युवा क्रिकेटपटू मेहदी हसन हृदोय याचं वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी निधन झालं आहे. हृदोय हा डावखुरा वेगवान गोलंदाज होता. त्याने चटगाव विभागाच्या १८ वर्षांखालील संघाचं प्रतिनिधित्व केलं होतं. हृदोयला ल्युकेमिया हा ब्लड कॅन्सरचा आजार झाला होता आणि त्याच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान २४ ऑक्टोबर रोजी राजधानी ढाका येथे त्याची प्राणज्योत मालवली. हृदोयच्या निधनाच्या वृत्ताने क्रिकेटविश्वावर शोककळा पसरली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर पोस्ट करत युवा क्रिकेटपटूच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. अल्पवयातच उदयोन्मुख खेळाडूने जगाचा निरोप घेतल्याने क्रिकेट चाहत्यांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.बांगलादेशी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, मेहदी हसन हृदोय याला उपचारासाठी रुग्णवाहिकेतून ढाका येथे नेलं जात असताना शनिवारी त्याची प्राणज्योत मालवली. हृदोयच्या उपचारांचा खर्च भागवण्यासाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाकडूनही आर्थिक मदत केली जात होती.२ जुलै रोजी युवा आणि क्रीडा राज्यमंत्री अमिनुल हक यांनी बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या कार्यालयात हृदोयचे वडील अबुल कासिम यांच्याकडे ५ लाख टका रकमेचा धनादेश सुपूर्द केला होता. याशिवाय, हृदोयच्या उपचारांचा खर्च भागवण्यासाठी युवा आणि क्रीडा मंत्रालयाने त्याच्या कुटुंबीयांना स्वतंत्रपणे आणखी ५ लाख टकांची आर्थिक मदत दिली होती.



पीव्ही सिंधू फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत

फ्रेंच : दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे. शनिवारी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात तिने जपानच्या हिना अकीचीचा पराभव केला.३१ वर्षीय सिंधूने जागतिक क्रमवारीत २२व्या स्थानावर असलेल्या अकीचीवर २१-१०, २०-२२, २१-१६ असा विजय मिळवला. हा सामना एक तास १३ मिनिटे चालला. अंतिम सामन्यात सिंधूचा सामना कोरियाच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या आन से-यंगशी होईल. यापूर्वी सिंधूने जुलैमध्ये जपान ओपनचे विजेतेपद पटकावले होते.पहिल्या गेममध्ये सामना ४-४ आणि ८-८ अशा बरोबरीपर्यंत पोहोचला. इंटरव्हलपर्यंत सिंधूने ११-९ अशी आघाडी घेतली.यानंतर सिंधूने वेग वाढवला आणि शेवटच्या १२ पैकी ११ गुण जिंकले. तिने १८ मिनिटांत पहिला गेम २१-१० असा आपल्या नावावर केला. दुसऱ्या गेममध्ये माजी वर्ल्ड चॅम्पियन सिंधू चार पॉइंट्सने पिछाडीवर होत्या. त्यांनी वेग वाढवत स्कोअर ७-७ असा बरोबरीत आणला. दोन्ही खेळाडू १०-१० पर्यंत बरोबरीत राहिल्या, त्यानंतर अकीचीने आघाडी घेतली.वर्ल्ड नंबर-११ सिंधूने १४-१४ अशी बरोबरी साधत पुनरागमन केले. अकीचीने पुन्हा आघाडी घेत गेम पॉइंट मिळवला. अकीचीने दुसरा गेम २२-२० असा जिंकला.तिसऱ्या गेममध्ये सिंधूने ५-३ अशी आघाडी घेत सुरुवात केली. अकीचीने पुनरागमन करत ६-५ अशी आघाडी मिळवली. सिंधूने पुन्हा पुनरागमन केले आणि इंटरव्हलपर्यंत दोन पॉइंट्सची आघाडी घेतली.अकीचीने नेटवर चूक केल्याने सिंधूने १८-१६ अशी आघाडी घेतली. सिंधूने शेवटचा गेम २१-१६ असा जिंकला.

भारत पदकतालिकेत चौथा

■ सर्वोत्तम कामगिरी करीत ११४ पदके जिंकली ■ पॅरा एशियन गेम्सचा समारोप

। जपान । वृत्तसंस्था ।

एशियन पॅरा गेम्स २०२६ चा समारोप समारंभ संपला आहे. जपानमधील नागोया येथे शनिवारी झालेल्या समारोप समारंभात निशाद कुमार आणि मोना अग्रवाल यांनी तिरंगा हातात घेतला.भारताने यावेळी विक्रमी ११४ पदके जिंकली आणि पदकतालिकेत चौथे स्थान मिळवले. एशियन पॅरा गेम्समधील भारताची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी २०२२ मध्ये हांगझोऊ येथे झालेल्या गेम्समध्ये भारतीय संघाने १०८ पदके जिंकली होती.

जपानमध्ये प्रथमच झालेल्या या स्पर्धेत ४५ देशांतील सुमारे ४,००० खेळाडू आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. आशियाई पॅरा गेम्सची पहिली आवृत्ती २०१० मध्ये चीनमधील ग्वांगझू येथे झाली होती. आता २०३० मध्ये सहाव्या आशियाई पॅरा गेम्सचे यजमानपद दोहा भूषवणार आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एशियन पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारताने विक्रमी ११४ पदके जिंकल्याबद्दल आनंद आणि अभिमान व्यक्त केला. त्यांनी म्हटले की, खेळाडूंच्या मेहनतीने, समर्पणाने आणि स्वतःवरील विश्वासाने हे असाधारण यश मिळवून दिले आहे.त्यांची कामगिरी तरुणांना आव्हानांना घाबरू नये, मोठी स्वप्ने पाहावीत, समर्पणाने मेहनत करावी आणि सकारात्मक राहावे, यासाठी प्रेरणा देते.



निशाद कुमारने २०२६ एशियन पॅरा गेम्समध्ये हाय जंप आणि लाँग जंपमध्ये सुवर्णपदके जिंकली. निशादने टोकियो आणि पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये रौप्यपदके जिंकली आहेत.

मोनाने जपानमधील आयची-नागोया येथे झालेल्या एशियन पॅरा गेम्स २०२६ मध्ये दोन सुवर्णपदके जिंकली. तिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग १ स्पर्धेत २५० गुणांसह गेम्स विक्रम केला. त्यानंतर महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स १ स्पर्धेत ३५७.५ गुण मिळवत सुवर्णपदक जिंकले आणि जागतिक विक्रम प्रस्थापित केला.

४३५ पदकांसह चीन अव्वल

चीन ४३५ पदकांसह पहिल्या स्थानावर राहिला. यजमान जपानने १८६ पदके जिंकून दुसरे, तर उझबेकिस्तानने १४५ पदकांसह तिसरे स्थान मिळवले. दक्षिण कोरिया १०० पदकांसह पाचव्या स्थानावर राहिला. त्याने शेवटच्या दिवशी ३ पदके जिंकली, मात्र त्यापैकी फक्त १ सुवर्णपदक होते. त्यामुळे भारत चौथ्या स्थानावर कायम राहिला.

तस्कीन अहमदचे पुनरागमन

। ढाका । वृत्तसंस्था ।

तस्किन अहमदचे बांगलादेश कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात खेळणार आहे. ३१ वर्षीय तस्किनला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात विश्रांती देण्यात आली होती. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी १५ सदस्यीय संघ जाहीर केला. हा सामना २८ ऑक्टोबरपासून मीरपूरच्या शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये खेळवला जाईल. ही मालिका आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग आहे. नाहिद राणा दुखापतीची तपासणी करण्यासाठी सध्या ऑस्ट्रेलियात आहे. जुन्या दुखापतीमुळे तो पहिल्या कसोटी सामन्यातून बाहेर झाला आहे.

पुना वेस्टर्न क्लब करंडक

अजित वाडेकर संघाचे सलग दोन विजय

। पुणे । प्रतिनिधी ।

डीजेएसजी क्रिकेट अकॅडमी आणि स्पोर्ट्स व्हेंचर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुना वेस्टर्न क्लब करंडक आंतरक्लब १३ वर्षाखालील मुलांच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत अजित वाडेकर क्रिकेट अकॅडमी संघाने सलग दोन विजयांची कामगिरी केली. भुगाव येथील द पूना वेस्टर्न क्लब येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत कैवल्य शिंदेने फटकावलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर अजित वाडेकर क्रिकेट अकॅडमीने लाईनअप क्रिकेट अकॅडमीवर ८३ धावांनी विजय मिळवला.

पहिल्यांदा खेळताना अजित वाडेकर क्रिकेट अकॅडमीने १८१ धावांचे लक्ष्य उभे केले. कैवल्य शिंदे याने ५३ धावांची खेळी केली.



स्वराज गोगावले (३२ धावा) आणि स्वरा गाडे (२३ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. लाईनअप संघाच्या भागेश साठे याने २६ धावांत पाच गडी बाद केले. याला उत्तर देताना लाईनअप क्रिकेट अकॅडमीचा डाव ९८ धावांवर संपुष्टात आला. अजित वाडेकर संघाच्या आर्या व्यास हिने तीन गडी बाद केले. श्लोक सुरवे आणि श्रीजा गोगावले यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

दुसऱ्या सामन्यात स्वरा गाडे हिने केलेल्या ४० धावांच्या जोरावर अजित वाडेकर संघाने डीजेसीए क्रिकेट अकॅडमीचा ४७ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या अजित वाडेकर क्रिकेट अकॅडमीने १७.३ षटकात १४५ धावा धावफलकावर लावल्या. स्वरा गाडे (४० धावा), अबिर चोर (३५ धावा) आणि आर्या व्यास (२४ धावा) यांनी संघाचा डाव बांधला. डीजेसीएच्या आयुश सातपुते याने ३४ धावांत निम्मा संघ बाद केला. याला उत्तर देताना डीजेसीए क्रिकेट अकॅडमीचा डाव ९८ धावांवर आटोपला. युवी निबुडे याने ३८ धावा करून प्रतिकार केला. सुरंजन चौधरी याने १४ धावांत तीन गडी तर, पंकज शिंदे याने दोन गडी बाद केले.

स्प्रिंगर नेचर, यूबीएस संघाचा दुसरा विजय

। पुणे । प्रतिनिधी ।

पुणेज कॉर्पोरेट क्लॅश क्रिकेट लीग २०२६फ स्पर्धेत साखळी फेरीत स्प्रिंगर नेचर, यूबीएस संघाने दुसरा विजय नोंदवला. व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट मैदान, थेरगाव येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात जॉन वाघमारे(३-११) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर बार्कलेज संघाने एसएस अँड सी ऍडव्हेंट संघाचा ४ गडी राखून पराभव केला.

राहुल नागदे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर स्प्रिंगर नेचर संघाने एआरएआय संघाचा २८ धावांनी पराभव केला. अन्य लढतीत सुनील कुंभार याने केलेल्या भेदक गोलंदाजीचा



जोरावर यूबीएस संघाने केपीआयटी संघाचं ३८ धावांनी पराभव केला.

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजित पिंपरी चिंचवड करंडक आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत २नाईन स्पोर्ट्स क्लब आणि सह्याद्री किंग्ज् या संघांनी प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून दिवस गाजवला. हिंजेवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सागर नागमुळे याने फटकावलेल्या धावांच्या जोरावर एचएस पँथर्सचा पराभव केला.

लिओनेल मेस्सीला स्पेनचा सर्वोच्च क्रीडा सन्मान

। स्पेन । वृत्तसंस्था ।

दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांना स्पेनचा सर्वात प्रतिष्ठित क्रीडा पुरस्कार प्रिन्सेस ऑफ ऑस्टुरियास पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्पेनच्या राजकुमारी लिओनोर यांनी मेस्सी यांना हा पुरस्कार दिला.

लिओनोर या स्पेनच्या सिंहासनाच्या वारसदार आहेत आणि त्यांच्याच नावाने हे पुरस्कार दिले जातात.अर्जेंटिनाच्या ३९ वर्षीय फॉरवर्डची जूनमध्ये या पुरस्कारासाठी विजेता म्हणून निवड करण्यात आली होती. त्यांच्या शानदार कारकिर्दीसाठी तसेच वंचित मुलांच्या आरोग्य आणि



शिक्षणासाठी केलेल्या मदतीसाठी ज्युरीने त्यांना हा पुरस्कार दिला.

ब्रिटिश लेखक ज्युलियन बार्न्स, अमेरिकी अंतराळवीर क्रिस्टीना कोच आणि पंक स्टार पॅटी स्मिथ यांच्यासह इतर विजेत्यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. डझनभर चाहते अर्जेंटिनाची फुटबॉल जर्सी घालून समारंभात पोहोचले. मेस्सी येताच त्यांनी त्यांचे नाव घेत घोषणा दिल्या. समारंभात बॅगपाइप आणि ढोल वाजवण्यात आले.मेस्सी यांना पुरस्कारासोबत पार्चमेंटवर लिहिलेले औपचारिक प्रमाणपत्र देण्यात आले. लिओनोर यांनी त्यांच्या अनोख्या कारकिर्दीचे कौतुक केले.

मेस्सीची फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंमध्ये गणना केली जाते. त्यांनी आठ बॅलन डी'ओर पुरस्कार, एक विश्वचषक आणि क्लब स्तरावर डझनभर ट्रॉफी जिंकल्या आहेत. मेस्सी अर्जेंटिनासाठी सर्वाधिक गोल करणारे, सर्वाधिक असिस्ट देणारे आणि सर्वाधिक सामने खेळणारे खेळाडू आहेत.

मुंबई महापौर चषक शालेय बुद्धिबळ स्पर्धा

बुद्धिबळाच्या पटावर युवा खेळाडूंचा जलवा!

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी-मुंबई महापौर चषक शालेय बुध्दिबळ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत ७ वर्षाखालील गटात अर्जुन कुलकर्णीने तर ११ वर्षाखालीलगटात अहान काटरुकाने गटविजेतेपद पटकाविले.

निर्णायक आणि पाचव्या फेरीत अपराजित अर्जुन कुलकर्णीने राजवीर विचारेच्या राजाला २१ व्या चालीला शह देत गटविजेतेपदाला



गवसणी घातली. माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी विजेत्या खेळाडू अर्जुनला आकर्षक चषक आणि भेटवस्तू देऊन गौरविले.

सुरु झालेल्या स्पर्धेमधील ११ वर्षाखालील गटातील पहिल्या पटावर फिडे गुणांकित अहान काटरुकाच्या आक्रमक चालींना कैवल्य परबने तोडीस तोड प्रत्युत्तर देत अखेर बलाढ्य प्रतिस्पर्ध्यास बरोबरी करण्यास भाग पाडले.

एनरिक नॉर्त्या तिसऱ्या कसोटीतून बाहेर

। गेकेबरहा । वृत्तसंस्था ।

दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज एनरिक नॉर्त्या मांडीच्या सांध्याला झालेल्या दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर झाला आहे. दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरी कसोटी २७ ऑक्टोबरपासून केप टाउन येथे खेळवली जाईल.

यजमान संघाने नॉर्त्याला वगळता संघात कोणताही बदल केलेला नाही. गेकेबरहा कसोटीत नॉर्त्याला दुखापत झाली होती. त्याने पहिल्या डावात केवळ ३.३ षटके गोलंदाजी केली आणि तो मैदानाबाहेर गेला. दोन्ही संघ तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ ने बरोबरीत आहेत.

दक्षिण आफ्रिकेच्या तिसऱ्या कसोटी सामन्यासाठीच्या संघात टेम्बा बावुमा (कर्णधार),



मार्क्स एकरमॅन, डेव्हिड बेडिंघम, कॉर्बिन बॉश, मॅथ्यू ब्रीट्झके, गेराल्ड कोएत्झी, सायमन हार्मर, मार्को यान्सन, केशव महाराज, एडन मार्करम, वियान मुल्डर, सेनुरान मुथुसामी, डेन पॅटरसन, कगिसो रबाडा, रायन रिकेल्टन आणि काइल वेरेन यांचा समावेश आहे. नॉर्त्याच्या जागी कॉर्बिन बॉश, गेराल्ड कोएत्झी किंवा डेन पॅटरसन यांच्यापैकी कोणाला तरी संधी मिळू शकते.

दक्षिण आफ्रिकेकडे डावखुरा फिरकीपटू केशव महाराज यांचाही पर्याय आहे. गेकेबरहा कसोटीत सायमन हार्मर यांना एकमेव फिरकीपटू म्हणून कायम ठेवण्यात आले होते आणि महाराज यांना संघाबाहेर ठेवण्यात आले होते.काइल वेरेन यांना राखीव यष्टिरक्षक म्हणून संघात कायम ठेवण्यात आले आहे. त्यांना दुसऱ्या कसोटीतून वगळण्यात आले होते.दुसऱ्या कसोटीत रायन रिकेल्टन यांनी यष्टिरक्षण केले होते आणि फलंदाजी क्रमात ते खालच्या क्रमांकावर उतरले होते.मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. दोन्ही संघ २७ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान न्यूलँड्स येथे तिसऱ्या आणि निर्णायक कसोटीत आमने-सामने येतील.

बीसीसीआय वूमेन्स चॅलेंजर्स स्पर्धा

रायगडच्या रोशनी पारधीची निवड



। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व एसबीसी क्रिकेट अकॅडेमी महाडची गुणवान अष्टपल्ले क्रिकेट खेळाडु रोशनी रविंद्र पारधी हिची नुकतीच बीसीसीआय आयोजित एकोणीस वर्षाखालील वूमेन्स चॅलेंजर्स टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून एकूण चार मुलींची निवड स्पर्धेसाठी झाली त्यामध्ये रोशनी पारधी, भाविका अहिरे, ईश्वरी आस्वारे, ग्रीशा कटारिया यांचा समावेश करण्यात आला आहे.

रायगडच्या रोशनी पारधी हिची निवड होताच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य ॲड. पंकज पंडित, प्रदिप खलाटे, संदीप जोशी, प्रशिक्षक तहा चिचकर यांनी रोशनी हिच्या महाड येथील निवास्थानी जाऊन तिचा सत्कार केला. या प्रसंगी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी रोशनी हिच्या सह तिच्या पालकांचे व प्रशिक्षकांचे आवेश चिचकर बशीर चिंचकर यांचे अभिनंदन केले आहे . रोशनी हिने अत्यंत कमी वयात उतुंग भारीरी घेत व खूप कष्ट घेऊन महाराष्ट्राच्या महिला संघात स्थान मिळवले आहे आता तिची निवड बीसीसीआय आयोजित एकोणीस वर्षाखालील वूमेन्स चॅलेंजर्स स्पर्धेसाठी झाली असल्याने भविष्यात तिची खेळातली कामगिरी उचलून लोवकरच तिची निवड भारताच्या महिला संघात व्हावी अशी समस्त रायगड वासियांची इच्छा असल्याचे अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले. रोशनी पारधी हिचे वडील रविंद्र पारधी यांनी अंत्यत कष्टाने रोशनीला क्रिकेट खेळण्यासाठी पाठिंबा देत असून आपल्या गरिबीवर मात करत रोशनीच्या पाठीमागे खंबीर असल्याने त्यांचा सुद्धा आम्हाला अभिमान असल्याचे पाटील म्हणाले. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन रोशनीला तिच्या भावी वाटचालीसाठी मदत करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारतीय संघाचे सामने तटस्थ ठिकाणी | **अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित**

पाकिस्तानात रंगणार महिला विश्वचषक

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयसीसीने महिला टी-२० विश्वचषक २०२८ स्पर्धेची घोषणा केली आहे. ही स्पर्धा ७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान आयोजित केला जाईल. पाकिस्तान या स्पर्धेचा मुख्य यजमान देश असेल. परंतु, भारताच्या सामन्यांच्या ठिकाणाबाबतचा अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला भारताचे सामने वगळता सर्व सामने आपल्या देशात आयोजित करायचे आहेत, तर दुसरीकडे भारतीय संघाचे सर्व सामने तटस्थ ठिकाणी होण्याची शक्यता आहे.

भारतीय संघ नसलेले सर्व गट आणि बाद फेरीचे सामने आयोजित करण्यास आम्ही तयार आहोत. संयुक्त अरब अमिराती हे तटस्थ ठिकाण असण्याची शक्यता आहे, कारण पाकिस्तान आणि दुबई दरम्यानचा प्रवासाचा वेळ कमी असल्याने लॉजिस्टिक्स पोहोचवण्यास आणि व्यवस्थापित करण्यास सोपे होईल.

याचा अर्थ असा की, १२ संघांचा महिला टी-२० विश्वचषक पाकिस्तानमध्ये आयोजित केला



जाईल, तर भारतीय संघाचे सामने दुबईमध्ये खेळले जातील. जर भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचू शकला नाही, तर अंतिम सामना पाकिस्तानमध्येच लाहोरमध्ये आयोजित केला जाऊ शकतो.

आयसीसीचे हायब्रीड मॉडेल यशस्वी ठरले

आयसीसीने प्रामुख्याने २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपासून एक हायब्रीड मॉडेल सादर केले. या स्पर्धेचे आयोजन पाकिस्तानने केले होते, तर भारताने आपले सर्व सामने दुबईमध्ये खेळले. इतर स्पर्धांसाठीही अशाच प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे. २०२३ चा आशिया कप पाकिस्तान आणि श्रीलंका यांनी संयुक्तपणे आयोजित केला होता, ज्यात भारताचे सर्व सामने श्रीलंकेत खेळले गेले. २०२५ च्या महिला विश्वचषकासाठी, पाकिस्तानने भारताचा दौरा केला नाही आणि आपले सर्व सामने कोलंबोमध्ये खेळले. पीसीबीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, २०२८ च्या महिला टी-२० विश्वचषकासाठीही याच मॉडेलचा अवलंब केला जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028

दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.

■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर

(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)